रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ।वर्ष ८९ ।अंक ३७। पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, रविवार, दि. १३ जुलै २०२५

किंमत ४ ₹


## जयंत पाटील यांचा राजीनामा



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते व शरद पवार यांच्याकडे पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याची मागणी काही दिवसांपूर्वी केली होती. तसेच ही जबाबदारी नव्या तरुण चेहऱ्याकडे देण्याची विनंती त्यांनी केली होती. दरम्यान, प्रदेशाध्यक्ष पदावर शशिकांत शिंदे यांची निवड होणार आहे. ते मंगळवारी (दि.१५) पदाची सूत्रे स्वीकारणार असल्याची माहिती समोर आली आहे.


**अलिबाग-नागाव प्रॉपर्टी विकणे आहे**

अलिबाग नागाव हायवे टच, लक्झरीयस् प्रॉपर्टीज, १५.५ गुंठे! रेडी टू बिल्ड प्लॉट Suitable for फार्महाऊस/रिसॉर्ट/ हॉटेल/ स्विमिंग पूल! Fast Ownership Transferable, प्राईम लोकेशन, इलेक्ट्रिसीटी, भरपूर पाणी, ५०+ नारळ, सुपारी आणि हापूस आंब्याची झाडे, फुल झाडांचा बगीचा, उत्तम कनेक्टिव्हिटी, परमंट कंपाउंड, क्लिअर टायटल, CCTV.

**मालक : ९७६९१०८१७०**


# तारीख ठरली, नामांतर कधी?

**। उरण । प्रतिनिधी ।**

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पाहणीसाठी शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह थेट भेट दिली. यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन कामाचा आढावा घेतला. दरम्यान, सप्टेंबरमध्ये विमानतळाचा शुभारंभ होईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. हा दौरा झाला, फोटो काढले गेले, चर्चा झाली; पण, जनतेला अपेक्षित असलेली नामकरणाची घोषणा करण्यात आलेली नाही. विमानतळाचे उद्घाटन कधी करायचे तेव्हा करा, पण आधी विमानतळाला दि.बांच्या नावाची घोषणा करा, अशी मागणी संघर्ष समितीकडून करण्यात आली आहे.**

## नवी मुंबई विमानतळाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जगातील सर्वात जलद 'बॅग क्लेम सिस्टीम' विकसित करण्यात यावी, हे या विमानतळावरील प्रमुख वैशिष्ट्य असावे, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी पाहणीदरम्यान संबंधितांना येथे दिली. सद्य:स्थितीत या विमानतळाचे •> पान २ वर



## दिबांचे नाव देण्याचा प्रश्न अद्यापही गुलदस्त्यात

"विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे याबाबत १६ जुलै २०२२ रोजी केंद्र सरकारकडे ठराव पाठविण्यात आलेला आहे. दिबांचे नाव देण्यावरुन राज्य आणि केंद्र सरकार आजपर्यंत हो म्हणतेय, परंतु प्रत्यक्षात कोणतीही आधीसूचना काढण्यात आलेली नाही. त्यामुळे सरकारच्या भूमिकेवर जनतेतून संशय निर्माण झाला आहे. त्यामुळे उद्घाटन करायचे तेव्हा करा; पण तत्पूर्वी नावाची आधीसूचना काढावी, अन्यथा जनतेचा उद्रेक होईल. – **भूषण पाटील,** सरचिटणीस, सर्वपक्षीय संघर्ष समिती"

### उद्घाटनाआधी नाव जाहीर करा; जनतेची सरकारकडे मागणी

लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव या विमानतळाला देण्यात यावे यासाठी सर्वपक्षीय संघर्ष समितीने सरकार दरबारी हा प्रश्न लावून धरला आहे. दरम्यान, एवढ्या थाटामाटात झालेल्या दौऱ्यानंतरही सर्वसामान्य जनतेला सर्वाधिक महत्त्वाचा असलेला प्रश्न विमानतळ प्रत्यक्षात सुरू कधी होणार? आणि त्याचं नाव काय असणार? याचे उत्तर अद्याप अनुत्तरित आहे. म्हणजेच, विमानतळाच्या प्रत्यक्ष सुरुवातीचा आणि नामकरणाचा विषय पुन्हा एकदा गुलदस्त्यात ठेवण्यात आला आहे. सरकारने विमानतळाच्या उद्घाटनाआधी नाव जाहीर करावे, अशी येथील जनतेची मागणी असल्याचे सांगण्यात येत आहे.

## वेधक

### अलिबाग शहरात तरुणीचा विनयभंग

**अलिबाग :** अलिबाग शहरातील मुन्ना चायनीजशेजारी असलेल्या गल्लीत अल्पवयीन मुलीचा विनयभंग करण्यात आला. तिच्याकडून तिच्या आईचे दोन लाख ८६ लाख रुपयांचे दागिनेदेखील घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आरोपीविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, यज्ञेश घरत असे या आरोपीचे नाव आहे. हा परहूरपाडा येथील रहिवासी आहे. त्याच्याविरोधात मारामारी, धक्काबुक्की, शाब्दीक वाद केल्याप्रकरणी •> पान २ वर

### तरुणीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न

**अलिबाग :** अलिबाग शहरामध्ये भर लोकवस्तीत दिवसाढवळ्या एका २५ वर्षीय तरुणीवर परप्रांतीय कामगाराने अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान, अलिबागमधील प्रसिद्ध वकील ॲड. संतोष म्हात्रे यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. आरोपीला पोलिसांच्या ताब्यात दिले असून, अलिबाग पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा परप्रांतीय कामगार आहे. शहरातील कामत आळी येथील एका झेरॉक्स सेंटरजवळ २५ वर्षीय तरुणी •> पान २ वर

# भीषण अपघातात दोघांचा मृत्यू

**। उरण । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील पागोटे गावाजवळील पुलाजवळ शनिवारी दुपारी भीषण अपघात घडला. एमएच ४३ सीजे ४०१० या दुचाकीवरून प्रवास करत असलेल्या एका तरुण व तरुणीचा या अपघातात जागीच मृत्यू झाला. या दोघांचेही प्राण घटनास्थळीच गेले. दोघेही नवी मुंबई परिसरातील असल्याची माहिती मिळत आहे. मात्र, एवढा भीषण अपघात घडूनही प्रशासनाचे मौन आणि अपघाताचं कारण अद्याप गुलदस्त्यात आहे.

हा अपघात किती जोरदार होता, याचा अंदाज मृतदेहांच्या अवस्थेवरूनच लावता येतो. पुलावरच रक्ताच्या थारोळ्यात तरुण-तरुणी तडफडले, पण वेळेवर मदतीचा हात कुणीच दिला नाही. तरी अपघाताचे नेमके कारण काय, हे अजूनही स्पष्ट झालेले नाही.

उरण परिसरात अपघातांची मालिका आता सवयीची झाली आहे. दर महिन्याला कोणी ना कोणी या रस्त्यांवर जीव गमावतोय. पण त्यासाठी ना पुलावर गतिरोधक, ना सीसीटीव्ही, ना वेगमर्यादा यंत्रणा.. सर्वकाही रामभरोसे सुरू आहे. प्रशासनाला फक्त अपघातानंतर प्रेसनोट काढायला वेळ आहे, पण याआधी उपाययोजना करायला वेळ नाही. अपघातात मृत्युमुखी मृतदेह उरणमधील इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलवण्यात आले असून, पुढील तपास उरण पोलीस करत आहेत.

# ज्वेलर्सचा ग्राहकांना साडेसहा कोटींचा चुना



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

एक ग्राम सोने घेऊन १६००/- रुपयांचा नफा मिळवून देण्याच्या उद्देशाने पनवेलमधील डी.एम. कोठारी ज्वेलर्सने अनेकांना कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी डी.एम. कोठारी ज्वेलर्सच्या दुकानासमोर निदर्शने करून समोर आणला आहे. तळोजा तसेच पनवेलमधील स्थानिक शेतकऱ्यांनी डी.एम. कोठारी याला अटक करून आम्हाला न्याय द्या, अशी मागणी पोलीस प्रशासनाला केली आहे.

यामध्ये काही •> पान २ वर

# पाकिस्तानी बोया अखेर सापडला

## रायगड पोलिसांचे यशस्वी सर्च ऑपरेशन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मुरुड-कोर्लई किनाऱ्यावरून बेपत्ता झालेल्या संशयास्पद पाकिस्तानी बोयाचा अखेर शोध लागला आहे. रायगड पोलिसांनी राबवलेल्या व्यापक सर्च ऑपरेशनदरम्यान हा बोया रेवदंडा-आंग्रेनगर किनाऱ्यावर शुक्रवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आढळून आला. पोलीस सूत्रांनी ही माहिती दिली असून, पाच दिवसांपासून सुरू असलेल्या या शोधमोहिमेनंतर सुरक्षा यंत्रणांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आहे.

सदर घटना ६ जुलै रोजी रात्री घडली होती. कोर्लई किल्ल्याजवळ



Muqadar Boya 99 (MMSI: 463800411) नावाची एक बोट आढळली होती. प्रथमदर्शनी ती बोट संशयास्पद वाटल्याने खळबळ उडाली होती. प्राथमिक तपासानुसार ही बोट पाकिस्तानातून आलेली असावी, अशी शक्यता वर्तवण्यात आली होती. घटनेची माहिती मिळताच भारतीय तटरक्षक दल, नौदल व केंद्र सरकारच्या सुरक्षा यंत्रणांनी तत्काळ लक्ष घालून स्थानिक पोलिसांना •> पान २ वर







# दुकान फोडणारे पोलिसांच्या ताब्यात

## • तीन लाखांपेक्षा अधिक मुद्देमाल जप्त • खोपोली पोलिसांची कारवाई

| अलिबाग | प्रमोद जाधव |

खालापूर तालुक्यातील ताकई फाटा येथील दुकान फोडणाऱ्या चोरट्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून तीन लाख वीस हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खोपोली पोलिसांनी ही कारवाई केली.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खोपोली परिसरातील शिळगाव येथील रहिवासी रामचंद्र रासकर यांच्या मालकीचे ताकई फाटा येथे दुकान आहे. गुरुवारी (दि.३) रात्री दोन ते तीन वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी खिडकीतून घुसून घरफोडी केली. दुकानात असलेल्या पॉलिकॅब कंपनीच्या तीन लाख २० हजार रुपये किमतीच्या केबलसह अन्य ऐवज चोरण्यात आला होता. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

चोरीच्या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक अभिजीत व्हरांबळे, पोलीस हवालदार अमित सावंत, पोलीस हवालदार संदीप चव्हाण, पोलीस हवालदार निलेश कांबळे, पोलीस नाईक लिंबाजी शेडगे, पोलीस शिपाई समीर पवार, पोलीस शिपाई रामा मासाळ, पोलीस शिपाई किरण देवकाते, पोलीस शिपाई प्रणित कळमकर, पोलीस शिपाई आकाश डोंगरे यांचे पथक तयार करण्यात आले.

या पथकामार्फत तपासाची सूत्रे हाती घेण्यात आले. परिसरातील वीस ठिकाणांचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यामध्ये गुन्ह्यात वापरलेले वाहन निष्पन्न झाले. त्यानंतर दुचाकीच्या मालकाची माहिती घेण्यात आली. मोबाईल क्रमाकांच्या तांत्रिक विश्लेषणाद्वारे अज्ञात चोरट्याचा शोध सुरू केला. अखेर उत्तर प्रदेश येथील मुळ रहिवासी असणारा झुबेर शेख (३४) याला अटक करण्यात आली. त्यानंतर अन्य साथीदारांचा शोध घेण्यात आला. त्यांना पुणे, नाशिक व गुजरातमधून उचलण्यात आले. गुजरातमधील अंकलेश्वर पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाच्या मदतीने तिघांना ताब्यात घेतले. गुन्ह्यात वापरलेली पिकअप गाडीदेखील जप्त करण्यात आली. यातील आणखी एक आरोपी मुंब्रा येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याला कल्याण शिळफाटा येथून ताब्यात घेतले. जुबेर शेखसह आलम मनियार, दिपक तिवारी, रामविलास यादवर, जुबेर मेमन, सिराउजद्दीन खान या सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आले असून यातील चारजण मूळचे उत्तर प्रदेश राज्यातील आहेत. यातील तिघेजण सध्या पुणे येथे राहात होते. एकजण पुणे जिल्ह्यातील कुदळवाडी येथील असून, आणखी एकजण ठाणे जिल्ह्यातील खडीगावमधील आहे.

### सहाजण सराईत गुन्हेगार

ताकई फाटा येथे दुकानात घुसून केलेल्या चोरी प्रकरणातील सहा आरोपींना पकण्यास खोपोली पोलिसांना यश आले. हे सर्व आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. त्यांच्याविरोधात चोरी, घरफोडी, जबरी चोरी, अशा अनेक प्रकारचे गुन्हे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात दाखल असल्याची माहिती खोपोली पोलिसांनी दिली.

### अनेक दिवस दुकानावर लक्ष होते

चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी जुबेर शेख याला सुरुवातीला पोलिसांनी अटक केली. त्यानंतर अन्य आरोपींना ताब्यात घेतले. जुबेर शेख हा मूळचा उत्तर प्रदेश राज्यातील घौसी येथील रहिवासी आहे. तो गेल्या अनेक वर्षांपासून खालापूर तालुक्यातील लौजी येथे राहात होता. मोलमजुरीसह काही कामे तो या परिसरात करीत होता. ताकई फाटा येथील दुकानावर त्याचे अनेक दिवसांपासून लक्ष होते. त्यानंतर मित्रांच्या मदतीने त्याने दुकान फोडले.

### गुन्ह्यात वापरलेली रिक्षा चोरीची

ताकई फाटा येथे झालेल्या चोरीच्या गुन्ह्यात पिकअप गाडी, ऑटो रिक्षा अशी अनेक वाहने वापरण्यात आली आहे. ही वाहने पोलिसांनी जप्त केली असून, त्यांची किंमत चार लाख ९० हजार रुपये इतकी आहे. चोरट्यांनी लंपास केलेला ऐवज नेण्यासाठी रिक्षाचा वापर केला होता. ही रिक्षा चोरीची असल्याचे उघड झाले आहे. मिराभाईंदर येथील ही रिक्षा असल्याची माहिती समोर आली आहे. याची नोंद कासेगाव पोलीस ठाण्यात असल्याचे सांगण्यात आले आहे.



## शिवणसई आंबे शाळेत मोफत छत्री वाटप

| पनवेल | प्रतिनिधी |

पावसाळ्याचे दिवस चालू असून, विद्यार्थ्यांचे पावसापासून संरक्षण होण्यासाठी रायगड जिल्हा परिषद शाळा शिवणसई आंबे येथे रिटघर गावचे ॲड. रेश्मा गुरुनाथ भोपी व गुरुनाथ भोपी यांच्याकडून शिवणसई शाळेत विद्यार्थ्यांना मोफत छत्री वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रुप ग्रामपंचायत दुदरेचे सरपंच सुभाष भोपी, ॲड. गुरुनाथ भोपी, माजी सरपंच भारत भोपी, दुदरेग्रामपंचायतीलसदस्यविश्वास पाटील, ग्रामसेवक अजिनाथ खेडेकर, संतोष पाटील, विजय पाटील, जगदीश पाटील, सुभाष पालकर आदी मंडळीसह शाळेचे मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद, महिला मंडळ शिवणसई आंबे आदी उपस्थित होते.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ जुलै

१) श्रीम. वंदना विठोबा पाटील मु.कुरूळ, अलिबाग, १३-७-१९४७

२)श्री.हरेश्वर नारायण पाटील मु.बोरिस, अलिबाग १३-७-१९६०


### कृषीवलच्या वाचकांना आवाहन





अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते




आरव किरण पवार, वाढदिवस अलिबाग


## कर्जतच्या पोलीस निरीक्षकपदी संदीप भोसले

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जतचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांची दहशतवाद विरोधी शाखेत बदली करण्यात आली आहे. त्यांच्याकडे गुन्हे शाबिती शाखेचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. गरड यांच्या जागी नियंत्रण कक्षातील संदीप भोसले यांची कर्जत पोलीस निरीक्षक म्हणून नेमणूक देण्यात आली आहे.



# खोपटा येथील पूल धोकादायक

## सळ्या बाहेर पडल्याने अपघाताचा धोका

| चिरनेर | प्रतिनिधी |



खोपटे पुलावर पडलेल्या खड्ड्यांमुळे सदर पूल रहदारीसाठी धोकादायक बनला असून, लोडबेरिंगने जोडलेल्या या पुलाच्या लोखंडी सळ्या निखळल्याने अपघाताचा धोकाही वाढला आहे. या पुलावरून सध्या मोठ्या प्रमाणात जड कंटेनर वाहनांची वाहतूक होत आहे. या डळमळीत झालेल्या रहदारीच्या पुलामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या पुलावर अनेक अपघातही झाले आहेत. यामुळे संतप्त नागरिकांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी समाज माध्यमातून तीव्र नाराजी व्यक्त केली असून, या खोपटे पुलाची लवकरात लवकर दुरुस्ती न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

दरम्यान सहा महिन्यापूर्वी खोपटे पुलाच्या दुरुस्तीची निविदा जाहीर करण्यात आली आहे. पुलाच्या दुरुस्तीसाठी आधुनिक पद्धतीने पुलाचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. मात्र, आजपर्यंत या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे या पुलाचे काम कधी सुरू होणार असा सवाल येथील प्रवासी व नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. या वाढत्या पुलावरील खड्ड्यांमुळे अवजड वाहनांचा अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने जुन्या खोपटे पुलाच्या मजबुतीकरणासाठी पाच कोटी रुपयांच्या खर्चाचा आराखडा तयार केला आहे. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून प्रत्यक्षात कामाला सुरुवात केलेली नाही. दुचाकीवरून जाणाऱ्या प्रवाशांबाबत अपघाताच्या घटना वारंवार घडत असल्याची माहिती खोपटे येथील सामाजिक कार्यकर्ते गोरख ठाकूर, प्रशांत ठाकूर यांनी दिली. तर वेळ पडल्यास आंदोलन करू, असाही इशारा त्यांनी दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित मोडणाऱ्या या पुलाची देखभाल, दुरुस्तीची जबाबदारी त्यांच्यावर आहे. मात्र, सार्वजनिक विभाग याकडे कानाडोळा करत आहे. त्यामुळे अवजड वाहनांबरोबर प्रवासी वाहनानादेखील धोका निर्माण झाला आहे. खोपटे पूल ते कोप्रोली हा मार्गही धोकादायक झाला आहे. याचा फटका येथील प्रवाशांना बसत आहे. त्यामुळे खोपटा पूल आणि मार्गाची लवकरात लवकर दुरुस्ती करा, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

> जुना खोपटा पूल धोकादायक नाही. या पुलाची तपासणी करण्यात आली आहे. तर पुलाच्या दुरुस्ती आणि मजबुती करणासाठी निविदा मंजूर करण्यात आली असून, या कामाला सुरुवात होणार आहे. त्यानुसार या पुलाचे मजबुती करण करण्यात येणार आहे. तसेच पुलावरील वारंवार उखडत असलेल्या थरांवर उपाय म्हणून नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून थर टाकण्यात येणार आहेत.
>
> – नरेश पवार, अतिरिक्त अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उरण

# पोषण ट्रॅकर प्रणाली होणार कार्यान्वित

## • अलिबागमध्ये ऑनलाइन नोंदणी प्रशिक्षण

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागामार्फत बालविकास प्रकल्प अधिकारी, मुख्य सेविका व अंगणवाडी सेविका यांच्यासाठी पोषण ट्रॅकर व घरपोच आहार ऑनलाइन नोंदणीबाबत विशेष प्रशिक्षण गुरुवारी (दि.१०) अलिबाग तालुक्यात आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

पोषण ट्रॅकर प्रणाली अंगणवाडीच्या कामकाजातील सर्वाधिक महत्त्वाचा विषय आहे. या प्रणालीच्या माध्यमातून कामकाज करताना अंगणवाडी सेविकांना काही अडचणींचा सामना करवा लागतो. यामुळे दैनंदिन समस्यांचे निराकरण व इत्यंभूत मार्गदर्शन या प्रशिक्षणाच्या माध्यमातून बालविकास प्रकल्प अधिकारी, मुख्य सेविका व अंगणवाडी सेविका यांना देण्यात आली. तसेच लाभार्थ्यांना घरपोच आहार ऑनलाइन नोंदणी संदर्भातील ॲपबाबतही तज्ज्ञांमार्फत प्रशिक्षण देण्यात आले. यामुळे अंगणवाडी सेविका व मुख्य सेविकांना पोषण ट्रॅकर वापराबाबत येणाऱ्या समस्यांचे निराकरण होऊन कामकाजात सुलभता होईल, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व महिला व बालविकास विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक यांनी व्यक्त केला.

# कर्करोगावरील शस्त्रक्रिया यशस्वी

## मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आंशिक नेफ्रेक्टॉमी

## • रुग्णाचे मूत्रपिंड वाचविण्यात डॉक्टरांना यश

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

यूरोलॉजिस्ट डॉ. विकास भिसे यांच्या नेतृत्वाखालील टीमने मूत्रपिंडाच्या कर्करोगाचे निदान झालेल्या ३५ वर्षीय रुग्णावर यशस्वीरित्या उपचार केले. आंशिक नेफ्रेक्टॉमी अशा किमान आक्रमक तंत्राचा वापर करून, उर्वरित मूत्रपिंडाचे जतन करत ट्यूमर काढून टाकण्यात आले, ज्यामुळे रुग्णाला जगण्याची दुसरी संधी मिळाली.

नवी मुंबईचे रहिवासी असलेले व वाहन चालक म्हणून कार्यरत असलेल्या ३५ वर्षीय रुग्ण संजय जैस्वार यांना काही दिवसांपासून मूत्रावाटे रक्तस्रावाची समस्या आढळून आली. सुरुवातीला रुग्णाने त्याकडे दुर्लक्ष केले. पण जेव्हा हे तीन ते चार दिवस सतत त्यांना ही समस्या आढळून आली तेव्हा मात्र त्यांनी डॉक्टरांकडे धाव घेतली. त्यानंतर सखोल तपासणीअंती रुग्णाला कर्करोगाचे निदान झाले. त्यांच्या सुरुवातीच्या तपासानंतर त्यांना डॉ. विकास भिसे यांच्याकडे पाठवण्यात आले, ज्यांनी या स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी ताबडतोब सीटी युरोग्राफी करण्याचे आदेश दिले. स्कॅनमध्ये त्यांच्या डाव्या मूत्रपिंडात २.७२.५२ सेमी आकाराचा ट्यूमर आढळला. ट्यूमरचे स्थान आणि आकार लक्षात घेता, सर्वोत्तम उपाय म्हणजे आंशिक नेफ्रेक्टॉमी, ही एक अशी शस्त्रक्रिया आहे जी मूत्रपिंडाचा फक्त ट्यूमरने प्रभावित असलेला भाग काढून टाकते, ज्यामुळे निरोगी ऊतींना हानी पोहोचत नाही आणि मूत्रपिंडाचे कार्य सुरळीत राखता येते.

डॉ. विकास भिसे(यूरोलॉजिस्ट) सांगतात की, सुरुवातील रुग्णालयात दाखल झाल्यावर रुग्णाने मूत्रावाटे रक्तस्रावाची तक्रार केली. अल्ट्रासाऊंड आणि सीटी स्कॅन सारख्या तपासण्या केल्यानंतर रेनल सेल कार्सिनोमा म्हणजे मूत्रपिंडाचा कर्करोगाचे निदान झाले. २६ जून रोजी रुग्णावर पार्शियल नेफ्रेक्टॉमीशस्त्रक्रिया करण्यात आली. पार्शियल नेफ्रेक्टॉमी म्हणजे मूत्रपिंडाचा काही भाग काढून टाकण्याची शस्त्रक्रिया. या शस्त्रक्रियेमध्ये, फक्त बाधित भाग, ट्युमर काढला जातो, ज्यामुळे मूत्रपिंडाचे कार्य शक्य तितके चांगले टिकून राहते व निरोगी ऊतींना हानी पोहोचत नाही. प्रगत लॅप्रोस्कोपिक तंत्रांचा वापर करून ट्यूमर अचूकपणे काढून टाकण्यास यश येते. या प्रक्रियेनंतर रुग्णाला अवघ्या दोन दिवसांत घरी सोडण्यात आले. ही शस्त्रक्रिया सुमारे २ तास चालली आणि २ दिवसांनी रुग्णाला घरी सोडण्यात आले. योग्य वेळी उपचार न केल्यास कर्करोग वाढणे यासारख्या गुंतागुंत निर्माण होऊ शकतात. डॉ. भिसे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मी आभार मानतो आहे. त्यांनी मला जगण्याची दुसरी संधी दिली असून, मी त्यांचा कायम ऋणी राहीन, असे रुग्ण संजय जैस्वार यांनी स्पष्ट केले.

# अफकॉन्सच्या डंपर वाहतुकीला ब्रेक

## • जमीनधारकांची परवानगी न घेता सुरू होती वाहतूक

| उरण | प्रतिनिधी |



कस्टम चाळ ते द्रोणागिरी माता मंदिर मार्गावर असलेल्या खासगी जमिनीवर जमीन मालकांशी कोणतीही चर्चा न करता, परवानगी न घेता अफकॉन्स कंपनीकडून सुरू असलेली डंपर वाहतूक अखेर जमीनधारकांच्या तीव्र विरोधामुळे थांबवावी लागली आहे.

गेल्या काही दिवसांपासून या रस्त्याने अवजड डंपरचा अव्यवस्थित व धोकादायक वावर सुरू होता. या मार्गावर अनेक जमिनी खासगी असून, तेथील जमीनधारकांच्या कोणत्याही मंजुरीशिवाय कंपनीने वाहतूक सुरू केल्याने हे गंभीर उल्लंघन झाले होते.

जमीनधारकांनी यासंदर्भात कठोर भूमिका घेतल्याने व कायदेशीर कारवाईचा इशारा दिल्यामुळे कंपनीला आपली वाहतूक थांबवावी लागली आहे. घटनास्थळी सामाजिक कार्यकर्ते सचिन डाऊर, जमीन मालक, ऑफकॅन्स कंपनीचे अधिकारी व पोलीस यांच्यात चर्चा सुरू होती.


## पान १ वरून


### तारीख ठरली, नामांतर कधी?

९४ टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित सहा टक्के काम सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करून पहिले प्रवासी विमान उडणार, याची ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रगतीपथावरील कामाची पाहणी करण्यासाठी आज या ठिकाणी आले असता ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, आ. मंदा म्हात्रे, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी किसन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शंतनु गोयल, राजा दयानिधी, गणेश देशमुख, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, गीता पिलाई, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय सिंह येनपुरे, उपायुक्त रश्मी नांदेडकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

या प्रकल्पाच्या उद्घाटनाची तारीख जाहीर करायची कुणाला भीती वाटतेय का? नामकरणावरून सुरू असलेली राजकीय रस्सीखेच अजूनही सुरू आहे का? का हे सगळं केवळ निवडणुकीच्या तोंडावर मतांची ताटं वाढवण्यासाठी लटकवलेलं गाजर असल्याची चर्चा जनतेत सुरू आहे.

### पाकिस्तानी बोया अखेर सापडला

सतर्क केले. पोलिसांच्या तपासात पुढे स्पष्ट झाले की, ही बोट नसून ती एक बोया म्हणजेच समुद्रातील मार्गदर्शक चिन्ह आहे. मात्र, बोया बेपत्ता झाल्याने आणि त्याचा पत्ता लागत नसल्याने सुरक्षा यंत्रणांची चिंता वाढली होती. त्यामुळे पाच दिवस सातत्याने शोधमोहीम राबवण्यात आली. अखेर रायगड पोलिसांच्या दक्षतेमुळे हा बोया रेवदंडा परिसरात आढळून आला.

या मोहिमेत तटरक्षक दल, नौदल व स्थानिक पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे सर्च व कोंबिंग ऑपरेशन राबवत परिस्थितीवर बारीक नजर ठेवली होती. या घटनेच्या पार्श्वभूमीवर कोकण किनारपट्टीवरील समुद्री सुरक्षेचा आढावा घेण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

तज्ज्ञांच्या मते, समुद्रमार्गे घडणाऱ्या संभाव्य घुसखोरी रोखण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा, सॉफ्टवेअर व स्थानिक यंत्रणांचा समन्वय अधिक बळकट करणे काळाची गरज आहे. यासारख्या घटनांतून सतर्कतेचा इशारा मिळत असून, किनारपट्टी सुरक्षा यंत्रणांची सज्जता टिकवणे अत्यावश्यक बनले आहे.

### ज्वेलर्सचा ग्राहकांना साडेसहा कोटींचा चुना

जणांचे १५ लाख, तर काही जणांचे ३४ लाख रुपये असे एकूण १७ जणांचे ६ करोड ५० लाख रुपये यांच्याकडे गुंतवणूक करण्यात आले. मागील वर्षी जुलैमध्ये डी.एम. कोठारी आपल्या परिवारासह पसार झाल्यामुळे या १७ शेतकऱ्यांनी डी.एम. कोठारी यांच्याविरोधात एफआयआर दाखल केली. यानंतर कोठारी यांनी वकिलामार्फत जामिनासाठी प्रयत्न केले, मात्र पनवेल न्यायालयात, उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयातदेखील त्यांना जमीन मिळाला नाही.

सदर प्रकरण नवी मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडे तपासासाठी असतानाही एक वर्ष उलटून गेले तरी अद्याप कोठारी यांना अटक झाली नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे कष्टाचे पैसे मिळण्याचा मार्ग दिसत नाही. यावेळी तक्रार दाखल केलेल्या शेतकऱ्यांनी कोठारी यांना तात्काळ अटक करावी आणि अजूनही कोणाचे पैसे त्यांनी बुडविले असतील, तर त्यांनी पोलिसांशी संपर्क साधून आपल्या तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहन केले.

सन २०२३ मध्ये डी.एम. कोठारी यांनी कमिशनच्या नावाखाली पैसे गुंतविण्याचा धंदा सुरु केला. सुरुवातीला त्याने काही जणांना याचे एक ग्राम सोन्याच्या भावाचे पैसे गुंतवणुकीवर १६०० रुपयांचे कमिशन दिले. सदर प्रकार त्याने एक वर्षे व्यवस्थित सुरु ठेवला. पैशाने पैसे वाढत आहेत, यासाठी ज्या शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला त्यांनी आपल्या मित्रपरिवारासह नातेवाईकांनाही यामध्ये पैसे गुंतवण्यास सांगितले. ज्यावेळी कोठारी यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाली, त्यावेळी कोठारी यांनी पनवेलमधून पळ काढला.

त्यानंतर गुंतवणूक केलेल्या शेकडो नागरिकांपैकी काही शेतकरी एकवटले, मागील वर्षी १९ जुलै २०२४ रोजी यातील १७ शेतकऱ्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात एफआयआर दाखल केली. सदर प्रकार आर्थिक फसवणुकीचा असल्याकारणाने हे प्रकरण बेलापूर येथील नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात आर्थिक गुन्हे शाखेकडे गेले. मात्र, वर्ष उलटूनही अद्याप आरोपीचा ठावठिकाणा पोलिसांना लागत नसल्यामुळे अखेर शेतकऱ्यांनी डी.एम. कोठारी यांच्या दुकानाजवळ येत निदर्शने करीय आपली कैफियत मांडली.

### अलिबाग शहरात तरुणीचा विनयभंग

यापूर्वी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. अलिबाग तालुक्यातील पीडित मुलीसोबत त्याची ओळख होती. पीडित मुलगी महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत आहे. महाविद्यालयामध्ये विनयभंग करून बदनामी करण्याची धमकी त्याने दिली होती. हा प्रकार करू नये, म्हणून त्याने तिच्या घरातून जबरदस्तीने आईचे दागिने आणण्यास तिला सांगितले. भीतीपोटी मुलीने घरातील दोन लाख ८६ हजार रुपये किमतीचे दागिने आणून अलिबाग शहरातील मुन्ना चायनीजशेजारी असलेल्या गल्लीत त्याला दिले. मात्र, त्याने त्या गल्लीत तिचा विनयभंग केला. याप्रकरणी त्याच्याविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात शुक्रवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो विवाहित असल्याची माहिती समोर येत आहे.

### ...अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न

शनिवारी सकाळी होती. ती एकटी असल्याचा फायदा घेत त्या कामगाराने तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार ॲड. संतोष म्हात्रे यांच्या निर्दशनास आला. त्यांनी त्या कामगाराला रोखून सतर्कता दाखवत तात्काळ अलिबाग पोलिसांना पाचारण केले. पोलीस हवालदार ज्योत्स्ना मासे यांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करून काही तासातच दोषारोप पत्र तयार करण्यात आले. दरम्यान, ॲड. संतोष म्हात्रे यांनी दाखविलेल्या प्रसंगावधानाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आरोपीला कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी तमाम अलिबागकरांकडून करण्यात येत आहे.

## पावणेतीन लाखांच्या ऐवजांची चोरी

| पनवेल | वार्ताहर |

तळोजा येथील वेअरहाऊसमधून पावणेतीन लाखांच्या ऐवजाची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात आठ जुलै रोजी करण्यात आला. विठ्ठल रखुमाई वेअर हाऊस अनंता फडके कंपाउंड तळोजा, एमआयडीसी येथील साईड बंद झाल्याची माहिती भरत राठोड यांना मिळाली. साईड वरील दोन लाख ७४ हजार रुपये किमतीचे प्रोसेसर युनिट, रॅन प्रोसेसरची चोरट्यांनी चोरी केली.

## 'आरटीओ कार्यालयात एडीसीच्या नावाखाली लाचखोरी'

**पनवेल** : पनवेल आरटीओ कार्यालयामध्येएडीसीच्यानावाखाली चालणाऱ्या दलालगिरी, लाचखोरी व अनधिकृत व्यक्तींबाबत १५ दिवसांत ठोस कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे पनवेल शहर युवक काँग्रेसचे शहबाज फारूक पटेल यांनी दिला आहे. पनवेल आरटीओ कार्यालयामध्ये गेल्या काही महिन्यांपासूर एडीसी नावाखाली काही अनधिकृत व्यक्ती खुलेआम वावरत आहेत. या दलालांच्या मदतीने ड्रायविंग लायसन्स, वाहन कागदपत्र ट्रान्सफर, तपासणी व इतर सेवा या नागरिकांकडून बेकायदेशीररित्या लाच घेऊन पूर्ण केल्या जात आहेत. हा प्रकार सामान्य नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली करणारा आहे. त्यामुळे एडीसीच्या नावाखाली वावरणाऱ्या सर्व अनधिकृत व्यक्तींना त्वरित आरटीओ कार्यालयातून हद्दपार करावे, अशी मागणी पटेल यांनी केली आहे.



# भेकऱ्याचा कोंड रस्त्याच्या कामाची चौकशी करा

| म्हसळा | प्रतिनिधी |




## शिवसेना ठाकरे गटाचे शहरप्रमुखांचे उपोषण

भेकऱ्याचा कोंड रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. त्या कामाची चौकशी करण्याची मागणी केली असतानाही चौकशी होत नाही. तात्काळ चौकशी करून संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, या मागणीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख विशाल सायकर यांनी येथील तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास सुरुवात केली आहे.

या रस्त्याच्या निकृष्ट झालेल्या कामाची तातडीने चौकशी व्हावी, आणी तो रस्ता पुन्हा बनवण्यात यावा अशी मागणी विशाल सायकर यांनी केली होती. ती न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता. मात्र, तरीही संबंधित अधिकाऱ्यांनी आजपर्यंत कसलीही कारवाई केली नाही. पण, चौकशीही केली नाही. त्यामुळे दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे सायकर हे मंगळवारपासून येथील तहसील कार्यालयासमोरआमरणउपोषणाला बसले आहेत. संबंधितांवर कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असे सायकर यांनी सांगितले. या आंदोलनाला राष्ट्रवादी शरद पवार गट श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष अजहर धनसे आणि अनेक संघटनांनी पाठिंबा दर्शवला आहे.

# महिला सुविधा केंद्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

## • शौचालयाअभावी महिलांची कुचंबना • सुविधेपेक्षा मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन महत्त्वाचे?

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

भिसेगाव येथे सार्वजनिक बांधकाम मंडळामार्फत महिलांसाठी अत्याधुनिकवातानुकूलितशौचालय आणि सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे. या सुविधा केंद्राचे काम पूर्ण होऊन ४ महिने लोटले असून फक्त उद्घाटनाची औपचारिकता बाकी आहे. या केंद्राचे उद्घाटन राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते २९ मे रोजी करण्यात येणार होते. परंतु, काही कारणास्तव त्यांचा शासकीय दौरा रद्द झाला. या गोष्टीला दीड महिना उलटा तरी हे शौचालय अजूनही उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे शौचालय अभावी येथील महिलांची कुचंबना होत आहे.




कर्जत स्थानकापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या भिसेगाव या ठिकाणी रिक्षा स्टँड तसेच बस, विद्यार्थ्यांचे आणि कंपनी बस थांबे असल्याने रिक्षा स्टँड आहेत. त्यामुळे या नाक्यावर कायम नागरिकांची वर्दळ असते. त्यातच परिसरात महिला व पुरुषांसाठी कोणत्याही प्रकारची शौचालयाची सुविधा नाही. मात्र, गेल्या अनेक वर्षांची मागणी आता पूर्ण झाली असली तरी महिलांसाठी का होईना सार्वजनिक बांधकाम विभागाने अत्याधुनिक आणि वातानुकूलित 'वूलू' नामांकित सुविधा केंद्र उभारले आहे. परंतु, उद्घाटन न झाल्यामुळे ते खुले करण्यात आलेले नाही. एकंदरीत सार्वजनिक विभागाला महिलांच्या सुविधेपेक्षा मंत्र्यांचे हस्ते उद्घाटन होणे महत्वाचे वाट असल्याचे दिसून येत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने महिला वर्गाला शौचालय सुविधा अभावी नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्याची बांधकाम विभागाने थोडी तसदी घ्यावी, असे वाटत नाही का? केवळ उद्घाटनाचा फार्स समोर ठेवून महिलांच्या आरोग्याशी खेळण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांसाठी तयार केलेल्या सुविधा केंद्राला मागील दीड महिन्याचा कालावधी उलटून गेला असून अद्याप हे सुविधा केंद्र महिलांच्या सोयीसाठी उपलब्ध करून दिले गेले नाही, ही मोठी शोकांतिका आहे. त्याबाबत महिला वर्गात प्रचंड नाराजी आहे. तसचे, सार्वजनिक बांधकाम विभागाने मंत्री महोदयांची वाट पाहण्यापेक्षा स्थानिक प्रशासनाकडून शौचालयाचे उद्घाटन करून ते महिलांसाठी खुले करावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

> **स्थानिक लोकप्रतिंधींसोबत चर्चा करून या शौचालयाचे उद्घाटन आठवड्याभरातच करण्यात येईल.**
> **– संजय वानखेडे, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, कर्जत**

> **चार महिन्यांपूर्वी या शौचालयाचे काम पूर्ण झाले आहे. उद्घाटन न झाल्याने शौचालय असून नसल्यासारखेच आहे. त्यामुळे महिलांना सुवेधेपासून वंचित रहावे लागत आहे. तरी संबंधित विभागाने या शौचालयाचे लवकरात लवकर उद्घाटन करून ते महिलांसाठी खुले करावे.**
> **– मनिषा ठोंबरे, भिसेगाव**

# बेरोजगारांना १०० टक्के रोजगाराची संधीः अतुल म्हात्रे

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात सुशिक्षीत बेरोजगार युवकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यांना सहजगत्या रोजगाराची संधी मिळत नाही. अशा सुशिक्षित युवकांना त्यांच्या शिक्षणाची पात्रता पाहून विविध स्तरावरील रोजगार देण्यासाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे जिल्ह्यातील विविध ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. या मेळाव्यात विविध स्तरांवर कार्यरत असणाऱ्या नामवंत कंपनींचे एचआर हेड उपस्थित असतात. त्यामुळे ५ हजाराहून अधिक बेरोजगार युवकांना १०० टक्के रोजगाराची संधी मिळत आहे, असे प्रतिपादन शेकापचे खजिनदार अतुल म्हात्रे यांनी केले आहे. रोहा तालुका शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने तसेच अतुल म्हात्रे यांच्या विशेष सहकार्यातून शनिवारी (दि.१२) रोजगार मेळाव्याचे आयोजन येथील कुणबी भवन येथे करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.




रोहा तालुक्यात प्रथमच शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. तसेच, प्रत्येक युवकांच्या चेहऱ्यावर एक आनंदाचे वातावरण निर्माण झालेले होते. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हसकर, जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, आरडीसीसी बँकेचे संचालक गणेश मढवी, रोहा तालुका चिटणीस शिवराम महाबळे, हेमंत ठाकूर, संदेश विचारे, गोपीनाथ गंभे, मारुती खांडेकर, महिला आघाडी प्रमुख कांचनमाळी, शेतकरी सभा अध्यक्ष अशोक घावटे, प्रफुल्ल घावटे, ॲड. रोशन पाटील, संतोष दिवकर, अमोल शिंगरे, विकी कदम यांच्यासह शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक-युवती बहुसंख्येने उपस्थित होते.

# 'माध्यम न पाहता संस्कार पाहावे'

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

आजच्या धकाधकीच्या जीवनात विद्यार्थाला स्पर्धेत ढकलू नका. ज्या शाळेत संस्कार मिळतील, अशा शाळेत नाव टाका. माध्यम कोणतेही घ्या, मात्र संस्कार होणे गरजेचे आहे. तसेच, आपले आरोग्य टिकवायचे असेल तर जीवनामधील काही नीतिमूल्य आपण पाळली पाहिजेत. त्यासाठी शत्रूला, निंदकाला माफ करण्याची तयारी आपण ठेवायला पाहिजे, असे प्रतिपादन डोंगरी मठाधिपती त्रिशा पाटील यांनी केले आहे. गुरुपौर्णिमेनिमित्त मुरूड येथील माळीसमाज सभागृहात प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. पुढे त्या म्हणाल्या, कठीण काळात मानवाने दुसऱ्याचा तिरस्कार करू नये. त्याचा आपल्या मनावर मोठा परिणाम होतो. दुसऱ्याच्या आनंदात सहभागी व्हा, त्याला त्याच्या पूर्व कर्माप्रमाणे यश मिळत असते.



# चित्रलेखा पाटील यांच्या प्रयत्नाने खड्डे बुजले



**। वाघ्रण । वार्ताहर ।**

अलिबाग-पेण मार्गावरील तीनवीरा भागातील रस्ता खड्ड्यात गेला होता. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करताना स्थानिक नागरिकांसह प्रवासी वर्गाला तारेवरची कसरत करावी लागत होती. त्याची दखल शेकापच्या राज्य मिडीया सेलच्या अध्यक्षा तथा प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी घेतली. त्यांच्या प्रयत्नाने वाघ्रण नाका ते वाघोली मार्गे तीनवीरा रस्त्यावरचे असंख्य खड्डे बुजवण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. त्याबद्दल वाघ्रणचे सरपंच राजेंद्र पाटील, सदस्य विपुल पाटील, शेकाप कार्यकर्ते तुकाराम पाटील, प्रमोद पाटील, संजय गोरखनाथ, विवेक पाटील कार्यकर्ते व रहिवाशांनी चित्रलेखा पाटील यांचे आभार मानले आहेत.

# महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ गाडी चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

शहरातील पाटील हॉस्पिटल समोर उभी करून ठेवलेल्या महिंद्रा कंपनीच्या स्कॉर्पिओ गाडीची चोरी झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जकीया अकबर अली कादरी (६८) यांची १ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ गाडी (एमएच-०६-एडब्ल्यू-६६१७) हि पाटील हॉस्पिटल समोरील रस्त्यावर उभी करून ठेवली होती. गाडीजवळ कोणी नसल्याचा फायदा घेत चोरट्याने ही गाडी चोरून नेली. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# चित्रलेखा पाटील यांच्याकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते मधूकर पाटील (७५) यांचे नुकतेच निधन झाले. शेकापच्या राज्य मिडीया सेलच्या अध्यक्षा तथा प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी शनिवारी (दि.१२) सकाळी सागाव येथे जाऊन पाटील कुटूंबियाची सांत्वनपर भेट घेतली.

मधूकर पाटील यांचे ६ जुलैला अल्पशा आजारामुळे निधन झाले. ते माजी पोलीस पाटील होते. त्यांनी शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते म्हणून खंबीरपणे जबाबदारी सांभाळली होती. त्यांच्या निधनाची माहिती चित्रलेखा पाटील यांना समजल्यावर त्यांनी शनिवारी सकाळी सोगाव येथे दिनानाथ पाटील यांच्या घरी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. यावेळी खरेदी विक्री संघ सदस्य विलास वालेकर, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, सदस्य संतोष गुरव, कामगार आघाडीचे सदस्य विनोद पाटील, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य नरेश गोंधळी, रुचिता भगत, प्रणय भगत, विजय गायकवाड, सागर गुरव, अमोल नाईक आदी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पाटील कुटूंबिय उपस्थित होते.

# गावाच्या विकासाकडे आमदारांचे दुर्लक्ष

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ विकास प्राधिकरणमध्ये असलेल्या ममदापूर ग्रामपंचायतमधील रस्ते, सांडपाणी व्यवस्थापन व कचरा संकलन यांचा बोजवारा उडाला आहे. या ग्रामपंचायत मधील स्थानिक पातळीवर रहिवाशी यांना आवश्यक असलेल्या कामे व्हावी, यासाठी स्थानिकांवर आमदार महेंद्र थोरवे यांना साकडे घालण्याची वेळ आली आहे. शिवसेना पक्षाची नेरळ जिल्हा परिषद गट आढावा बैठक नुकतीच पार पडली. त्यावेळी सामाजीक कार्यकर्ते रोशन शिंगे यांनी गावातील विकासकामांची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, ममदापूर हद्दीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करणे, नैसर्गिक नाले बंद करणे, शासनाच्या परवानगी पेक्षा वाढीव बांधकाम करणे यांसारख्या समस्यांवर कठोर कारवाई करावी. तसेच, सर्व प्रकारचे अतिक्रमण हटविण्याचे निर्देश नेरल संकुल विकास प्राधिकरणचे तांत्रिक अधिकारी यांना देण्यात याव्या, अशी मागणी केली आहे.



# मृत्यूनंतरही यातना संपेनात

**। पनवेल-आपटा । वार्ताहर ।**

आपटा दाभोळवाडी येथील एका वृद्ध महिलेचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या अंतिम संस्कारासाठी गावातील स्मशानभूमीत नेण्यात आले असता अत्यंत हलाखीची व हृदयद्रावक परिस्थिती समोर आली. स्मशान भूमीच्या छतावर छप्पर नसल्याने भर पावसात मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ आली. त्यामुळे ग्रामपंचायत आणि प्रशासनाच्या भोंगळ कारभाराविरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे.

पनवेल तालुक्यातील आपटा ग्रामपंचायत हद्दीत प्रामुख्याने आदिवासी समाज मोठ्या संख्येने राहतो. मात्र, या वाड्याकडे आपटा ग्रामपंचायत जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील भोवड यांनी केला आहे. त्यातच दाभोळवाडी येथील ज्येष्ठ महिला गिरजी गणा वाघे यांचे नुकतेच निधन झाले. येथील स्मशानभूमीला पत्रे नसल्याने नाहिलाजाने त्यांचे अंत्यसंस्कार भर पावसात करावे लागले. स्मशानभूमीत पत्रे किंवा कोणतीही छप्पर व्यवस्था नसल्यामुळे पावसात पार्थिव देह पूर्णपणे भिजला. कुटुंबीयांनी व आदिवासी बांधवांनी बाहेरून पत्रे आणून पार्थिवावर हाताने धरून संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. शेवटचा संस्कार ही प्रत्येक व्यक्तीचा मानवी हक्क असून, तो सन्मानाने व्हावा, अशी समाजाची अपेक्षा असते. मात्र, या घटनेमुळे ग्रामपंचायत व्यवस्थेचे अपयश स्पष्ट झाले आहे. तर, आपटा गंगेची वाडी येथील स्मशानभूमिचीही हीच अवस्था आहे. त्यामुळे त्यांनाही मोठ्या हाल अपेष्टा सोसाव्या लागत आहेत. त्यामुळे एकीकडे विकासाच्या बाता मारणाऱ्या आपटा ग्रामपंचायतीचा विचित्र कारभार चव्हाट्यावर आल्याने आदिवासी समाजाने नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिक ग्रामस्थांनी हा प्रश्न गंभीरतेने घेतला असून, जर लवकरात लवकर व्यवस्था न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## निवडक

### पिरकोन रस्त्याचे काम धीम्यागतीने

**चिरनेर :** उरण पूर्व विभागातील आवरे-पिराकोन या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम किमान दीडवर्षांपासून चालू आहे. परंतु, आजपर्यंत या रस्त्याचे काम धिम्यागतीने सुरू असल्याने पादचारी व वाहन चालकांना या रस्त्यावरुन ये-जा करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्याच्या कामात मोऱ्याची कामे अपूर्ण असून तेथे खड्डे पडल्याने वाहन चालकांना त्या खड्ड्यातून वाहने हाकावी लागत आहेत. त्यामुळे या रस्त्यावरचा हा प्रवास नकोसा वाटत आहे. त्यातच रस्त्याच्या दोन्ही बाजूला विजेचे खांब उभे असून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूला असणारे विजेचे खांब वेळीच बाजूला करावेत. नाहीतर काही वीजेचे खांब कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना जीवितहानीला सामोरे जावे लागेल, असे नागरिकांमधून म्हटले जात आहे.






### पिरवाडी चौपाटीवर स्वच्छता मोहीम

**उरण :** हिन्दुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड कंपनीच्या कामगारांनी स्वच्छता अभियान-२०२५ निमित्ताने उरण पिरवाडी चौपाटीवर शनिवारी (दि.१२) स्वच्छता अभियान राबविले. पिरवाडी चौपाटीवर विखरलेला केर कचरा गोळा करुन त्याची योग्य ती विल्हेवाट लावली. दरम्यान, यावेळी काढण्यात आलेल्या रॅलीतून कंपनीचे अधिकारी व कामगारांनी उरणवासियांना स्वच्छतेचे महत्व पटवून देत आपला परिसर स्वच्छ ठेवा, झाडे लावा यासह पर्यावरण वाचविण्याचे आवाहन करण्यात आले. या स्वच्छता अभियानात कंपनीचे वरिष्ठ स्थानक प्रबंधक शैलेंद्र राव, मॅनेजर प्रबंधक हेमंत कुमार, प्रबंधक अमेया श्री, सागरी कोस्ट गार्ड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे, शिवाजी ठाकूर, पोलीस कर्मचारी संदिप पाटोळे, जितेंद्र सावळाकर, नागावचे ग्राम विकास अधिकारी किरण केणी यांच्यासह कंपनीचे कामगार वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



### जि.प.चे अधिकारी रमले शेतात

**अलिबाग :** वातानुकूलित कार्यालयता बसून जिल्ह्याची सुत्रे हलविणारे जिल्हा परिषदेचे अधिकारी शेतात पोहचले. त्यांनी शुक्रवारी (दि.११) चिखलात उतरून भात लावणीचा अनुभव घेतला. यावेळी त्यांनी भाताची रोपे खणून काढून भात लावणी केली. 'एक दिवस शेतकऱ्यांसाठी' या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद कृषी विभागाच्यावतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह सर्व विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन भात पिक लागवडीचा कार्यक्रम करुन शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले. जिल्ह्यामध्ये सध्या भात लावणीची लगबग सूरू झाली आहे. शेतकरी भात लावणीच्या मग्न होऊ लागला आहे. एक दिवस शेतकऱ्यांसाठी हा उपक्रम जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात आला. कृषी विभागामार्फत सर्व खाते प्रमुख यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन एक दिवस शेतकऱ्यांसाठी या संकल्पनेतून भात पिक लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला. या उपक्रमांतर्गत अलिबाग तालुक्यातील भाल येथील एका शेतकऱ्याच्या शेतावर भात लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. भात लागवड कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, महिला व बालविकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचीक, सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पाठारे, कृषी विकास अधिकारी महेश नारायणकर, जिल्हा कृषी अधिकारी निकिता सुर्यवंशी, अलिबाग पंचायत समिती गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ यांच्यासह अलिबाग व मुरुड पंचायत समितीमधील अधिकारी सहभागी झाले होते. त्यांनी स्वतः शेतामध्ये उतरून भात लावणीचा आनंद लुटला.

**नोंदणीसाठी ३१ जुलै अंतिम तारीख** | **शेतकऱ्यांना लाभ घेण्याचे आवाहन**

# प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरु

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, याकरीता खरीप हंगामासाठी कृषी विभागामार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ जूलैपर्यंत शेतकऱ्यांना पिक विमा उतरविण्याची संधी दिली आहे. ॲग्रीकल्चरल इन्सुरन्स कंपनीमार्फत विमा उतरविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लवकरात लवकर पिक विमा योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.



ॲग्रीकल्चरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबविण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्यांना पिक विम्याचा लाभ दिला जाणार आहे. त्यात पेरणी न होणे, पुर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरीता विमा संरक्षण दिला जाणार आहे.

रायगड जिल्ह्यासाठी भात पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ६१ हजार रुपये असून नाचणी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम ३५ हजार रुपये आहे. त्यासाठी ई-पीक पहाणी अंतर्गत पिकांची नोंदणी करावी लागणार आहे. या योजनेंतर्गत भातासाठी १ एकर क्षेत्राकरिता १८३ रुपये तर १ हेक्टर क्षेत्रासाठी ४५७ रुपये हप्ता असणार आहे. तसेच, डोंगरभागात नाचणीचीदेखील मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. या लागवडीतून शेतकऱ्यांना उभारी मिळावी, म्हणून नाचणीच्या क्षेत्रातही वाढ करण्याचा प्रयत्न केला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नाचणी पिकाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे १ एकर क्षेत्रासाठी ३५ रुपये व १ हेक्टर क्षेत्रासाठी ८७.५० रुपये हप्ता असणार आहे. प्रधानमंत्री पिक विमा या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२५ करीता शेतकरी नोंदणीसाठी दि.३१ जुलै अंतिम तारीख आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पिक विमा उतरवावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत, तालुका प्रतिनिधी राहूल लाडगे व जिल्हा प्रतिनिधी पुरुषोत्तम सरनाईक यांनी केले आहे.

### विमा काढण्यासाठी हे करणे गरजेचे

पिक विमा काढण्यासाठी फार्मर आयडीची गरज आहे. सातबारा, आठ 'अ'चा उतारा असणे आवश्यक आहे. सोबत आधारकार्ड, बँक पासबुक, स्वयंम घोषणा पत्र, किसान क्रेडीट कार्ड व ई-पीक पाहणी करणे आवश्यक आहे. पिक विमा काढण्यासाठी सेवा केंद्र, बँक खाते असलेल्या बँकेत व विमा प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# वाहतूक कोंडीने कर्जतकर त्रस्त

## • विकेंडमुळे वाहनांच्या रांगाच रांगा ; स्थानिकांची नाराजी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका फार्म हाऊसचा तालुका समजला जातो. त्यामुळे विकेंडसाठी पर्यटक कर्जत तालुक्यात येत असतात. त्या वाहनांचा थेट परिणाम कर्जत तालुक्यातील वाहतुकीवर होताना दिसून येत आहे. तालुक्यातील या वाहनांमुळे रस्त्यावर वाहनामच्या रागांच-रागां पाहयला मिळत आहेत.


फार्म हाऊस आणि रिसॉर्ट तसेच माथेरान या पर्यटन स्थळी येणारे पर्यटकांमुळे तालुक्यातील रस्ते वाहनांमुळे भरून गेले आहेत. त्यामुळे शनिवार, रविवारचा स्थानिकांसाठी त्रासदायक ठरत आहे.

माथेरान या पर्यटन स्थळी येणाऱ्या पर्यटकामुळे नेरळ-माथेरान घाटरस्ता जाम होऊन जातो. त्याचा परिणाम नेरळ हुतात्मा चौक,जकात नाका तसेच कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील खांडाचौक येथे देखील होताना दिसून येतो.

कर्जत चारफाटा, मुरबाड रस्ता तसेच नेरळ माथेरान कडे जाणारी वाहने यांच्यामुळे वाहतूक कोंडीमुळे परिसरातील गावकऱ्यांना कर्जत बाजारपेठेत येता जाता त्याचा त्रास सहन करावा लोगतो. दिवसभर वाहनांची गर्दी असल्यामुळे स्थानिकांनी नाराजी व्यक्त करत आहेत.

## बाळू सानप यांना देवाज्ञा

**। खांब । वार्ताहर।**



रोहा तालुक्यातील गावठाण गावचे रहिवासी बाळू मोरेश्वर सानप यांचे सोमवार (दि.७) रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून एक बहीण असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी बुधवार दि.१६ जुलै रोजी तर अंतिम धार्मिकविधी शुक्रवार दि.१८ जुलै रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# आदिवासी बांधवांना छत्र्यांचे वाटप



**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्यावतीने सोगाव व चोरोंडे येथील सुमारे ३५ आदिवासींच्या कुटुंबांना गुरुवार (दि.१०) रोजी छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

घाडी हे आदिवासींच्या उन्नतीसाठी नेहमीच विविध उपक्रम राबवित असतात. आदिवासी बांधवांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांना दरवर्षी पावसाळ्यात छत्र्या वाटप करत असतात. यावर्षी घाडी यांनी ३५ आदिवासी कुटुंबांना छत्र्या वाटप केले. सदर छत्री वाटप मापगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुनिल थळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सतिश घाडी, सचिन घाडी, समद कुर, चंद्रकांत खोत, राजेंद्र घरत, विवेक जोशी, दिलीप मोंढे, रुस्तुम कुर, लाईक कप्तान, सुधाकर ठकरुळ, संतोष बांद्रे, अमोल मोंढे, गितेश ठकरुळ, नितेश ठकरुळ, निकेश अनमाने, आशिष पाटील व सचिन घाडी मित्रमंडळाचे सर्व सदस्य व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बौद्ध महासभेच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरास प्रतिसाद



**। वावोशी । वार्ताहर ।**

दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा तालुका रोहा, जिल्हा रायगड यांच्या वतीने रोहा येथील पडम बुद्ध विहार येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर व वर्षावास मालिकेचा भव्य प्रारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमादरम्यान धम्माचे महत्व, संघटनात्मक बांधणी, युवा कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आणि आगामी वर्षावास उपक्रमांवर विस्तृत चर्चा झाली. तसेच नवीन कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन व संघटन सशक्त करण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमास जिल्हा महासचिव लक्ष्मण सताणे, कोकण प्रदेश सरचिटणीस सुरेश जाधव, उपाध्यक्ष सुरेश वाटवे, एम. डी. कांबळे, यशवंत शिंदे सुभाष इंगळे, दामोदर मोरे, सूर्यकांत कांबळे, अमोल वाटवे, अनिल वाटवे, राजेश शिर्के, आप्पा तुळवे, तुळशीराम तुळवे, रुपेश शिंदे, मनोज शिंदे आदी उपस्थित होते.

# प्रलंबित मागण्यांसाठी शिक्षणाधिकाऱ्यांची भेट

**। खांब । वार्ताहर ।**

सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक सेवाभावी संघ रायगड यांनी गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून राजिप अलिबाग शिक्षणाधिकारी ललिता दहितूले यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी संघटनेच्या प्रलंबित प्रश्नांचे निवेदन देऊन महत्त्वाच्या प्राशनांबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हा सेवानिवृत्त शिक्षक संघ अध्यक्ष तुकाराम खांडेकर, वसंत शिंदे, दामोदर कडू, दीनानाथ जाधव, गजानन गुरव, सचिव सहदेव कापसे, मारुती कासार, अंकुश पाटील, भाई सोनकर, बि. व्ही. पवार, एन. एस. पाटील, नामदेव म्हात्रे, बाळकृष्ण पवार, सुदाम मेने, सुनील फाले, सुरेश पालकर, मुणगे जनाब, भालचंद्र गोरेगावकर, खाडे गुरुजी, मुकुंद गंभे अन्य सेवानिवृत्त शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते.





# शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी



**। उरण । वार्ताहर ।**

पी. पी. मुंबईकर विद्यालय, वेश्वी येथे शुक्रवार (दि.११) जुलै रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचे आयोजन रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, फुंडे यांच्या आरोग्य केंद्र समिती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या शिबिरात इनव्हीजन आय हॉस्पिटल ॲण्ड लेसर सेंटरच्या नेत्र तज्ज्ञांनी सहभाग घेतला. नेत्रतज्ज्ञ डॉ. अमीषा ठाकूर, जानवी पोपेटा आणि रिहॅब सय्यद यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून आवश्यक सल्ला दिला. या शिबिरातून एकूण ११० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. कार्यक्रमास प्रितम टकले, तृप्ती म्हात्रे यांनी मोलाचे सहकार्य केले. यावेळी पी. टी. भोये, प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर उपस्थित होते.

## श्रीवर्धन येथे वर्षवास साजरा

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन तालुक्यातील बौध्द समाजाची मातृसंख्या बौध्द हितकारणी सभा तालुका श्रीवर्धन दक्षिण विभाग संस्थेच्या माध्यमातुन वर्षवास (दि. १०) जुलै रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक श्रीवर्धन येथे संस्थेचे स्थानिक अध्यक्ष यशवंत लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. सदर प्रसंगी एच. आर. जाधव, चंद्रकांत हुंदिलकर, अशोक जाधव, हरिभाऊ तांबे, वंदना पवार, उर्मिला जाधव, ज्योती जाधव, शांताबाई जाधव, गौतम साखरे, मुकुंद जाधव अशोक सावंत, प्रणाली येलवे अनिल गमरे, रामदास येलवे, अशोक येलवे, प्रभाकर येलवेसंस्थेचे मुख्य पदाधिकारी व गाव शाखेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# नेने महाविद्यालयात रक्तदान शिबीर



**। खरोशी । वार्ताहर ।**

जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधुन पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेणमधील डी. एल.एल ई. युनीट, एन. एस. एस युनीट, अलिबाग जिल्हा रुग्णालय व पेण उप जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार (दि.११) रोजी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमुख डॉ. तुकाराम माळवे यांनी केले. यावेळी पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने, संस्थेचे माजी कार्याध्यक्ष वसंतराव आठवले, प्राचार्य डॉ. सदानंद धारप, डॉ. दिपक गोसावी, वैभव कांबळे, नवनाथ अळ्ळी, गणेश भोये, राजकुमार निकस,अभिषेक घरत, मंगेश पिंगाला, महेश घाडगे, डॉ.देवीदास बामणे, डॉ. सुभाष लकडे, कविता देशपांडे, रवि वाडजे, मंदा पाटील तसेच विद्यार्थी वर्ग व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रा. तुकाराम माळवे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. डी. के बामणे यांनी केले.

# पेण-खोपोली मार्ग मोकाट गुरांचा उपद्रव

**वावोशी :** खालापूर तालुक्यातील पेण-खोपोली मार्ग आणि त्याला लागून असलेल्या वडवळ, तांबाटी, खिरकंडी, डोणवत, आपटी व वावोशी या भागात मोकाट गुरांचा वाढता वावर वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरत असून, अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. दिवसाच्या वेळेस रस्त्यावर मुक्तपणे फिरणारी गुरं वाहतुकीस अडथळा ठरत आहेत, तर रात्रीच्या अंधारात विशेषतः काळ्या रंगाच्या गुरांमुळे वाहनचालकांना वेळेत काहीच कळत नाही. परिणामी अचानक अपघात घडत आहेत. काही घटनांमध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले असून, वाहनांचेही मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमच्या सांगण्यावरून अब्बासअली अमजदअली सयद व कासमअली अमजद अली सयद राहणार- शेखाचेगांव यांचे खुद्द मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील असलेली मौजे-पेढांबे, ता. अलिबाग, जि.रायगड शेतजमिन मिळकतीबाबत शोध/तपास करीत आहोत. सदरची मिळकतीचे विद्यमान मालक अब्बासअली अमजदअली सयद व कासम अली अमजद अली सयद राहणार-शेखाचेगांव यांच्याबरोबर आमचे आशिलांची खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याबाबतची बोलणी चालू आहे.

मौजे-पेढाबे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील दुय्यम निबंधक, अलिबाग यांच्या कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत आहे. मिळकतीचे वर्णन खलीलप्रमाणे आहे.

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| पेढांबे, ता.अलिबाग | १८७ | ०-४३-५० | ११.१९ |
| पेढांबे, ता.अलिबाग | २२६ | ०-३४-१० | ०.६४ |

जर कोणालाही/कोणचाही सदरील मिळकतीचे संदर्भात विक्री, अदलाबदल, हस्तांतरण, असाईन मेंट, देणगी, हवाला, वारसा, लायसन्स, देखभाल, बीकवेस्ट, इजमेंट, कॉव्हेनेट, गहाण, दान, बक्षिस, लीन, लिस करार, भाडेपट्टा, ताबा, वहिवाट, जप्ती, लिस पेंडन्स, एफ.एस.आय.वा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार, मागणी, हितसंबंध, वा दावा, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर लेखी कळवावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजुन आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण-अलिबाग.
दिनांक-१३/०७/२०२५.

सही/-
**श्री. नितीन रमानाथ नागवेकर.**
पत्ता- स्केअर डिल लॅन्ड कन्स्ल्टन्टस्
१०३, कृष्ण मंदीर को.ऑप.हौ.सोसा.
पहिला मजला, आसरा हॉटेल समोर,
मारुती नाका, अलिबाग- ४०२२०१.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमच्या सांगण्यावरून श्री. नितीन अनंत पाटील व श्री.संदिप अनंत पाटील राहणार-पेढांबे यांचे खुद्द मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील असलेली मौजे पेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड शेतजमिन मिळकतीबाबत शोध/तपास करीत आहोत. सदरची मिळकतीचे विद्यमान मालक श्री.नितीन अनंत पाटील व श्री.संदिप अनंत पाटील, यांच्याबरोबर आमचे आशिलांची खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याबाबतची बोलणी चालू आहे.

मौजे-पेढांबे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील दुय्यम निबंधक, अलिबाग यांच्या कार्यक्षेत्रातील खालील वर्णनाची मिळकत आहे. मिळकतीचे वर्णन खलीलप्रमाणे आहे.

| मौजे | गट नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| पेढांबे, ता.अलिबाग | १९३ | ०-३९-५० | ९.८७ |

जर कोणालाही/कोणचाही सदरील मिळकतीचे संदर्भात विक्री, अदलाबदल, हस्तांतरण, असाईन मेंट, देणगी, हवाला, वारसा, लायसन्स, देखभाल, बीकवेस्ट, इजमेंट, कॉव्हेनेट, गहाण, दान, बक्षिस, लीन, लिस करार, भाडेपट्टा, ताबा, वहिवाट, जप्ती, लिस पेंडन्स, एफ.एस.आय. वा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, अधिकार, मागणी, हितसंबंध, वा दावा, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विशद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर लेखी कळवावे,

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजुन आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण- अलिबाग.
दिनांक- १३/०७/२०२५.

सही/-
**श्री. नितीन रमानाथ नागवेकर.**
पत्ता- स्केअर डिल लॅन्ड कन्स्ल्टन्टस्
१०३. कृष्ण मंदीर को.ऑप.हौ.सोसा.
पहिला मजला, आसरा हॉटेल समोर,
मारूती नाका, अलिबाग- ४०२२०१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत जमीन मालक श्री.रामचंद्र गणपत ऐनकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-खांडस, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|
| ५७/४ | ०.५३.०० | ०.४१ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास, सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून, आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १३/०७/२०२५

सही/-
**ॲड. निता नरेश बैलमारे**
मो. ९२२६३३१५२६
ऑफीस : शॉप नं.१५, सनराईज अपार्टमेंट,
कचेरी रोड, कर्जत-रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे तळवली, ता. मुरुड, जि.रायगड येथील वडिलोपार्जित मिळकती ह्या सद्यस्थितीत माझे वडिल श्री.पास्कोल जोकी वेगस यांचे नावावर आहेत, त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| गट नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०९ पैकी | ०-८२-३०<br>पो.ख. ०-०७-००<br>०-८९-३० | १७-२१ |
| ११८ पैकी | ०-१९-५० | ०-१५ |

सदर मिळकती या माझे आजोबा श्री. जोकी गिरगोल वेगस यांचे मालकीच्या होत्या. परंतू त्यांचे दि. २८/०६/१९९९ रोजी निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात या मिळकती माझे वडिलांचे नावे नोंदविण्यात आल्या आहेत. वास्तविक सदर मिळकतींस मी श्री. मार्यान पास्कोल वेगस हक्काने वारस आहे. या मिळकतींमध्ये माझा अविभक्त हिस्सा आहे.

परंतू माझे वडिल श्री.पास्कोल जोकी वेगस हे सदर मिळकती परस्पर विक्री करणार असल्याचे मला खात्रीशिररित्या समजले आहे.

सदर मिळकतींना मी वारस असून माझ्या परवानगीशिवाय सदर मिळकती विक्री व्यवहारास माझी सक्त हरकत आहे..

सदर मिळकतींचा बेकायदेशिररित्या विक्री व्यवहार होत असल्याचे माझे निदर्शनास येत आहे. तरी सदर मिळकतींबाबत कोणीही कोणताही खरेदी व्यवहार करु नये. तो व्यवहार बेकायदेशिर ठरेल व तसे केल्यास तो व्यवहार माझेवर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कळावे,

अलिबाग
दिनांक : १२/०७/२०२५

सही /-
**श्री. मार्यान पास्कोल वेगस**
रा.कोर्लई, ता.मुरुड, जि.रायगड.
मोबाईल नं. ८९७५३६३२२३

## जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते कि, आमचे अशील श्री. सोनू कृष्णा पवार यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे जमीन मालकासोबत साठेकरार केलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| कोर्लई, ता.मुरुड, जि.रायगड | ३०/२/ब | ०-७२-२०<br>पो.ख. ०-०७-२०<br>एकुण ०-७९-४० | ११.९१ |
| कोर्लई, ता.मुरुड, जि.रायगड | ३२/१/अ | ०-१०-०१<br>पो.ख. ०-००-३८<br>एकुण ०-१०-३९ | २.१४ |

तरी वर नमूद मिळकतीबाबत जमीनमालकांनी माझ्या अशीलासोबत साठेकरार केलेला आहे. त्यामुळे या मिळकतीसंदर्भात माझ्या अशिलांच्या संमतीशिवाय कोणताही व्यवहार करू नये. तसा व्यवहार केल्यास माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याशिवाय संबंधित व्यक्तीवर माझे अशील दिवाणी अथवा फौजदारी स्वरुपाची कारवाई करतील, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १२/०७/२०२५

**(ॲड. व्ही. जी. पाटील)**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वारे, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अशोक एकनाथ कटारनवरे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| २५ | १/क | ०-२२-१० | १-४५ |
| २५ | २/अ | ०-१४-७० | ०-९४ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १३/०७/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ सर्वप्रकारचे आजार/संतानप्राप्ती/विवाह/दरमहा लाखास ३८००/- पेंशन/घरबसल्या पिढ्यांपिढ्या उत्पनासाठी डॉ.नथुराम शिहू (नागोठणा/पोयनाड) रायगड - ७५०७१६६०१५

■ ३००० चौ. फूट तिसरा मजला कमर्शिअल वापरासाठी भाड्याने देणे आहे. Contact- 9226379844

■ फिजीओथेरपी क्लिनिक अलिबागमध्ये पुरुष-महिला शिकाऊ थेरपीस्ट पाहिजेत. वय ३५ चे पुढे शिक्षणाची अट नाही. पगार+कमिशन =१० ते १५००० रु. wellness cilnic -9226766129,9370517949

■ नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. अकाऊंटंट (Accountant -Tally ERP+ GST, Advance Excel) वेटर, रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मो. ७५५९१८४६१२

■ पिक-अप ४०७, आयशट डंपर वरील ड्रायवर पाहिजे आहेत झिराड आणि मांडवा येथील सपर्क : ८८०६६८३२३२ /८००७८९३२३२

■ हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहे. १) नर्स ANM/GNM २) नर्स PRIVATE NURSING COURSE ३) मुले/मुली १२ वी पास, ४) X-RAY साठी मुले, आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र सोबत आणावे. संपर्क : ७७४५०५००२५/९११९५६५०२२/९३२१३०३९३८

■ अलिबाग स्टँडजवळ 1BHK ब्लॉक भाड्याने देणे आहे, ९१६८०२८५१७, हॉस्पिटलला मावशी व वॉर्डबॉय पाहिजे आहेत.

■ रानवडे हॉस्पिटलला पुरूष सफाई कामगार हवेत. उत्तम पगार. संपर्क : ९७६४९९५७२८

■ जुनी कपडे शिवायची मशीन पाहिजे ९७६५९८४५२५/७४२०८९२३१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन


१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# गुरु-शिष्य अद्वितीय जोडी



आपले सद्गुरु श्री मच्छिंद्रनाथ यांच्या आश्रमात त्यांचे शिष्य श्री गोरखनाथ सेवेसाठी राहत असत. रोज त्रिकाल साधना, ग्रंथ वाचन, सकाळी सद्गुरुसाठी भिक्षा सेवा, दिवसभर त्यांच्या सेवेत राहणे, गुरूंच्या दिव्य ज्ञान संदेशावर मननचिंतन असा त्यांचा दिनक्रम असे. सकाळची दैनंदिन साधना, नैमित्तिक कर्म झाल्यानंतर श्री गोरखनाथ आपल्या गुरूंसाठी पाच घरी भिक्षा आणण्यासाठी बाहेर पडत असत. भिक्षा आणून झाल्यानंतर ते आश्रमात गुरु सेवेसाठी येत असत. एके दिवशी श्री गोरखनाथ यांनी भिक्षेत मागून आणलेला वडा सद्गुरु मच्छिंद्रनाथांना खूप आवडला. त्यांनी श्री गोरखनाथ यांना बोलावून घेतले आणि जेथून हा वडा आणला होता त्या घरी जाऊन आणखी दोन वडे आणण्याची आज्ञा केली. ज्या ताईंनी भिक्षेमध्ये वडा घातला होता त्या ताईंकडे श्री गोरखनाथ गेले आणि त्यांना पुन्हा दोन वडे देण्याबद्दल हात जोडून विनंती केली. त्या बाईंनी पुन्हा वडे देण्यास नकार दिला. हे कोणीतरी भिक्षा मागणारे गोसावडे आहेत, असे तिला वाटले. तीने चेष्टेने त्यांना म्हणाली, तुझा एक डोळा देशील मला, तरच मी देईन वडे. शिष्य गोरखनाथ यांनी त्या बाईंच्या लक्षात येण्यापूर्वी आपला डोळा काढून तिच्या समोर ठेवला. त्या बाई थरथर कापायला लागल्या. त्यांना खूप वाईट वाटले. तिने ताबडतोब वड्याचे पीठ भिजवले आणि दोन वडे त्या भिक्षेकरी यांच्या स्वाधीन केले. सद्गुरु स्वामी बोध आपल्या व्यावहारिक बुद्धीला हे सर्व काल्पनिक वाटण्याचा संभव आहे. परंतु, सद्गुरु माऊली ज्यांचे लेकराप्रमाणे कौतुक करतात, ज्यांची सर्व प्रकारचे हट्ट पुरवतात आणि आपले सर्व वैभव ज्यांना प्रदान करतात ती शिष्य मंडळी अशा तोलामोलाची असावी लागतात. असे निष्ठावंत शिष्य खऱ्या अर्थाने सद्गुरुंना शरण गेली असतात. असे शिष्य सर्व बाबतीत सद्गुरुंशी एकरूप झालेले असतात. त्यांना प्रपंचाची आठवणही नसते. आत्म समर्पणाशिवाय दास्यत्व कधीही फलद्रुप होत नाही. गुरु सेवेतील दिव्या आनंदा प्रित्यर्थ ज्या शिष्य गणांनी आपले तन मन प्राण किंबहुना आपले सर्वस्व सद्गुरु चरणी समर्पित केलेले आहे. असे एकनिष्ठ सेवक शिष्य सद्गुरुंच्या अमर्यादा आनंदाचे आणि सत्तेचे वारस बनतात.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# माणगाव बसस्थानकाला नवी झळाळी

## • १२ फलाटांसह स्वतंत्र वाहतूक नियंत्रक कक्ष

**| माणगाव | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा महामार्गावर वसलेले माणगाव बस स्थानक हे वाहतुकीच्या दृष्टीने रायगड जिल्ह्याचा एक महत्त्वाचा केंद्रबिंदू मानला जातो. १९८२ मध्ये उभारले गेले असून बस स्थानकाचे क्षेत्रफळ ९,४५० चौरस मीटर आहे. तर, २०११ मध्ये माणगाव बसआगार झाले. त्याचे क्षेत्रफळ १९,२७८ चौरस मीटर आहे. हे स्थानक गेल्या चार दशकांहून अधिक काळ हजारो प्रवाशांची वर्दळ सामावून घेत आहे. त्याचे क्षेत्रफळ आज या स्थानकाला नवसंजीवनी मिळत असून ते अधिक आधुनिक, सुसज्ज आणि प्रवाशाभिमुख रूपात पुन्हा आकार घेत आहे.



माणगाव बस स्थानक व बसआगार या दोघांचाही समन्वय साधत सध्या सुरू असलेले नूतनीकरणाचे काम माणगाव शहराच्या वाहतूक व्यवस्थेला आणि प्रवासी सुविधांना नव्याने गती देणारे ठरत आहे. पूर्वी येथे ८ फलाटं होती. मात्र, गणेशोत्सव तसेच अन्य सण-उत्सवांच्या काळात प्रवासी संख्येत वाढ होणाऱ्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ते अपुरे पडत होते. त्यामुळे नवीन ४ फलाट वाढवण्याचे काम वेगात सुरू आहे. हे फलाट अधिक प्रशस्त व सुरक्षित असून यात्रेच्या काळात मोठ्या प्रमाणात प्रवाशांची वाहतूक सुरळीत करण्यासाठी मोलाचे ठरणार आहेत. या नूतनीकरणात केवळ फलाटच नव्हे तर बस चालक, वाहक व कर्मचाऱ्यांच्या विश्रांती गृहांचे नुतनीकरण, प्रसाधनगृहांची सुधारणा, तसेच गरम पाण्यासाठी गिझरची व्यवस्थाही केली जात आहे.

माणगाव बसस्थानकात प्रवाशांसाठी स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षितता हे तीन प्रमुख निकष केंद्रस्थानी ठेवून बस स्थानकाच्या प्लास्टरिंग, रंगरंगोटी व संपूर्ण विद्युतीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. विशेष म्हणजे, स्वतंत्र नवीन वाहतूक नियंत्रण कक्ष उभारण्यात येत असून त्यामुळे बस आगमन, प्रस्थान व आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन अधिक चोख होणार आहे. प्रवाशांना वेळेवर आणि अचूक माहिती मिळण्यासाठी हे पाऊल अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

अवघ्या ४५ दिवसांवर आलेला गणेशोत्सव लक्षात घेता, हे काम तातडीने पूर्ण करण्याचा प्रशासनाचा कटाक्ष आहे. कोकणातील या पर्वकाळात लाखो भाविकांचा प्रवास माणगाव मार्गे होतो. त्यामुळे स्वच्छ, सुसज्ज व सुरक्षित बस स्थानक ही काळाची गरज बनली आहे. या सर्व बदलांमुळे मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव बस स्थानक हे केवळ एक प्रवासी केंद्र राहणार नाही, तर प्रवाशांच्या मनात आश्वासकतेचा आणि सुविधांचा किरण बनून उभे राहणार आहे.

# पीक स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**आगरदांडा** : जिल्ह्यातील भात व नाचणी उत्पादक शेतकऱ्यांनी खरीप हंगाम पिक स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांनी केले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांकडे स्वतः च्या नावावर जमीन असणे व ती तो स्वतः कसत असणे आवश्यक आहे. तसेच, शेतकऱ्याला एकावेळी एकापेक्षा जास्त पिकांसाठी स्पर्धेत सहभाग घेता येणार आहे. भाग घेण्यासाठी संबंधिक कागदपत्रांच्या छायांकित प्रत जोडाव्या लागणार आहेत. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ऑगस्ट आहे. या स्पर्धेसाठी वेगवेगळे शुल्क आकरण्यात येणार असून विजेत्यांना रोख रक्कम बक्षिसाच्या स्वरुपात देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी संबंधित सहाय्यक व तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# आंबोट येथे जनजागृती शिबिराचे कार्यालय




**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील आंबोट रहिवाशी मिनेश मसणे यांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची नावनोंदणी आणि जनजागृती शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी आंबोट वासीयांचा भरघोस शिबिरात ई-श्रम कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, प्रधानमंत्री लाडकी बहिण योजना, विमा योजना, आधार-आभा कार्ड, एम्प्लॉयमेंट कार्ड, पेन्शन योजना यांसारख्या अनेक योजनांमध्ये नावनोंदणी व मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी दत्तोपंत ठेंगडी प्रतिष्ठान आणि भारत सरकारच्या श्रम मंत्रालयाचे अधिकारी मडावी, जगताप, मिलिंद भोईर व त्यांच्या सहकाऱ्यांची उपस्थिती लाभली. त्यांनी उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. दरम्यान, नागरिकांनी स्वतःचे कार्ड तयार करून घेतले.



# रामशेठ हातमोडेंचा सन्मान


**पनवेल** : गिरवले येथील शेतकरी आत्माराम हातमोडे यांनी परंपरागत पद्धतीला नाविन्यपूर्ण प्रयोग आणि संशोधनाची जोड दिली तर शेती ही अजूनही उत्तम उत्पन्न देत असल्याचे दाखवून दिले आहे. त्यामुळे या प्रगतशील शेतकऱ्याच्या कर्तृत्वाची दखल घेत पनवेल तालुका प्रेस क्लबच्यावतीने शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन त्यांना तहसीलदार विजय पाटील यांच्या हस्ते आदर्श शेतकरी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पनवेल तालुका प्रेस क्लब आणि रायगड प्रेस क्लब हे दरवर्षी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांचा गौरव करत असतात. यावेळी तहसीलदार विजय पाटील यांनी प्रगतशील शेतकरी रामशेठ हातमोडे यांचे कौतुक केले.


# फिरता दवाखाना ग्रामीण सेवेसाठी सज्ज

**| वावोशी | वार्ताहर |**

गावागावांत फिरत दृष्टीदान करणारा 'डोळ्यांचा फिरता दवाखाना' हा आरोग्यसेवेचा उपक्रम पुन्हा एकदा जनतेच्या सेवेत रुजू झाला आहे. लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट व श्री कृपा क्लिनिक, डोणवत-खालापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू झालेला हा उपक्रम, छत्तीशी विभागातील ग्रामीण आरोग्यसेवेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरत आहे.





डॉ. सुनील देवडीकर आणि डॉ. सुषमा देवडीकर हे दोघेही गेल्या अनेक वर्षांपासून खेडोपाड्यातील रुग्णांसाठी कार्यरत आहेत. त्यांच्या श्री कृपा क्लिनिकमधून अल्प दरात चांगली वैद्यकीय सेवा मिळत आहे. या सेवाभावी कार्यात आता लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्टचे डॉ. सुहास हळदीपुरकर सहभागी झाले असून, एक अत्याधुनिक उपकरणांनी सज्ज मोबाईल व्हॅनद्वारे डोळ्यांची तपासणी, मोतीबिंदूचे निदान आणि अल्प दरात चष्मा वितरण या सुविधा ग्रामीण भागात पोहोचवल्या जात आहेत. या फिरत्या दवाखान्याची सेवा दर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांची अत्यंत गरज असून, 'डोळ्यांचा फिरता दवाखाना' हा उपक्रम दृष्टीच नव्हे तर आशाही देणारा ठरत आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य १३ ते १९ जुलै २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## मेहनत आणि चिकाटीचे फळ मिळेल

**मेष :** राशीधारकांना या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्ही चिंतित राहाल. शत्रू पक्ष तुमच्यावर हानी होऊ शकतो. भौतिक साधनांवर निरर्थक पैसे खर्च होण्याची चिन्हे दिसत आहेत. लक्षात असू द्या, क्रोध सगळ्यात आधी तुमचे नुकसान करतो, म्हणून रागावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. वैवाहिक जीवनात संशय घातक ठरू शकतो. या विषयावर जोडीदारासोबत चर्चा करून तोडगा काढा. बाहेर खाणे टाळा, नाहीतर आरोग्यावर याचे वाईट परिणाम दिसून येतील. तरीही तुमच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. नवे वाहन किंवा घर वगैरे खरेदी करु शकता. मित्र प्रत्येक अडचणीत तुमची साथ देतील. सासरच्या लोकांकडून साहाय्य मिळेल. आर्थिक बाजू ठीक राहील. कम्प्यूटर व्यवसायाशी संबंधित लोकांसाठी वेळ चांगली असरणार आहे. शत्रूंची प्रत्येक चाल अयशस्वी ठरेल. **महिलांना-** नव्या संबंधांचा फायदा होईल. काहीतरी नवे घडणारच आहे. तुमच्या अपत्याला तुमचा वेळ हवा आहे, हे ध्यानात असू द्या. सुख आणि धन प्राप्तीचे संकेत आहेत. सांध्यांचे दुखणे किंवा शल्य चिकित्सा होऊ शकेल. **शुभ दिनांक- १४,१५.**

## सकारात्मक वातावरण कायम राहील

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता सर्व काही ठीक चालले आहे. लहानमोठया समस्या सोडल्या तर हा सप्ताह उत्तम चालला आहे. हा कालावधी कडू-गोड अनुभवांचा असेल. याची सुरूवात तर चांगली असेल, पण शेवटी काही समस्या भेडसावू शकतात. दीर्घ यात्रा फायदेशीर तर असतील पण यासाठी अधिक पैसेही खर्चावे लागतील. शत्रू आपल्याला त्रास देण्याचा पूरेपूर प्रयत्न करतील पण त्यांना यश येणार नाही. सप्ताहाच्या पूर्वार्धात खर्च अधिक होईल, ज्यामुळे धन संचयात अडचण निर्माण होईल. चांदीच्या तांब्यात वाहत्या नदीचे पाणी भरून ठेवल्यास फायदा होईल. या सप्ताहाच्या मध्यात सावध राहणे फारच गरजेचे आहे, कोणीतरी आपल्याविरुध्द कट रचत आहे. हलकीशी चूक आपल्याला महागात पडू शकते. एका मांगलिक कार्याचा योग जुळत आहे. सकारात्मक वातावरण कायम राहील. फार मेहनत करावी लागेल. हो, त्यानुसार फळही मिळेल. इच्छीत लाभाने आनंद होईल. **महिलांना-** स्त्रियांनी तब्येतीची काळजी घ्यावी. वजन वाढेल. नोकरीत पदोन्नती शक्य आहे. तब्येतही थोडी नाजुक राहील **शुभ दिनांक- १३,१५.**

## जीवनात प्रेमाची बहार येईल

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता या राशीच्या लोकांना आता खूप चांगले परिणाम मिळणार आहे. या कालावधीत प्रामुख्याने तुम्हाला करिअर आणि व्यवसायात यश मिळेल आणि तुम्ही तुमच्या यशाचा झेंडा फडकवाल. जे मनात येईल ते कराल. परंतु प्रामुख्याने आपल्याला आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल, कारण ह्या कालावधीत आरोग्याची समस्या आपल्यासाठी सर्वात मोठी चिंता असू शकते. तरीही आपल्या जीवनात प्रेमाची बहार येईल आणि आपण वेळोवेळी लव्ह लाईफचा आनंद घ्याल. विवाहित जीवनात कोणतीही मोठी समस्या उद्भवणार नाही. छोट्या छोट्या भांडणामुळे काहीही फरक न पडता वैवाहिक जीवनात आनंद कायम राहील. परदेशात जाण्याची इच्छा असणाऱ्यांना, ती पूर्ण करता येईल आणि त्यांना नवीन घर बांधण्याची संधीदेखील मिळू शकेल. **महिलांना-**आपला जोडीदार आपल्या प्रत्येक कामात आपले समर्थन करेल आणि वेळ आल्यावर नक्कीच मदत करेल. याचा परिणाम म्हणून तुमचे विवाहित जीवन चांगले राहू शकते. आपल्याला पैशांची चिंता करण्याची आवश्यकता नाही. **शुभदिनांक- १४,१६.**

## पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपले काम दुसऱ्यापुढे ढकलू नका आणि स्वतःची कामे स्वत: करण्याची सवय लावा. विलंब आपल्यासाठी मारक ठरू शकतो, त्यामुळे जसे जमेल तसे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा यश मिळेल. या कालावधीत आपल्या अनेक इच्छा पूर्ण होऊ शकतात, ज्यामुळे तुम्ही आनंदी राहाल आणि दीर्घ काळापासून अडकलेली कोणतीही योजना पूर्ण होईल, ज्याचा तुम्हाला चांगला फायदा होईल. आपल्या पालकांच्या आरोग्याची काळजी घ्या, कारण त्यांच्या सेवेशिवाय नशीब आणि आनंद मिळविणे अशक्य आहे. तसेच आपल्या कामाच्या क्षेत्राकडे थोडेसे लक्ष द्या, कारण आपल्याविरुद्ध काही कट रचले जाऊ शकतात किंवा कोणीतरी आपल्याविरोधात हालचाल करू शकते ज्यामुळे आपल्याला बदनामी सहन करावी लागेल. आपले कार्य पूर्ण प्रामाणिकपणाने करा आणि कोणालाही अशी संधी देऊ नका की आपल्याला कोणत्याही समस्येचा सामना करावा लागेल. **महिलांना-** घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही, आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. **शुभ दिनांक- १५,१७.**

## आपल्या प्रयत्नांना यश मिळेल

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता, या कालावधीत आपल्याला बरेच दुर्गम प्रवास करावे लागणार आहे जे आपल्यासाठी खूप फायदेशीर ठरतील आणि त्याद्वारे आपल्याला चांगले पैसे मिळतील आणि त्याच वेळी आपला सन्मान ही वाढेल. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले हा सप्ताह आपल्यासाठी खूप प्रगतिशील असल्याचे सिद्ध होऊ शकते. आपल्याला या सप्ताहात आव्हानांच्या दरम्यान चांगला अनुभव मिळेल. आपल्याला केलेल्या प्रयत्नांचे चांगले परिणाम मिळतील आणि आपण अधिक मेहनत घेत राहिल्यास हे निश्चितच हे दिवस चांगले सिद्ध होऊ शकतील. आपणास जीवनात स्थिरता आवडते आपण या दिशेने प्रयत्न केल्यास तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल. भविष्यावाणी अशी आहे की आपणास आपल्या मार्गावर येण्यासाठी आणि योग्य वेळी भिन्न पर्याय निवडावे लागतील तेव्हाच तुम्ही चांगले वातावरण उपभोग करू शकाल. **महिलाना-** आपण कोणत्या प्रकारचे निर्णय घेता हे महत्त्वाचे असेल, कारण ते निर्णयांचा मुख्यतः आपल्या कौटुंबिक आणि व्यावसायिक जीवनावर परिणाम होईल. **शुभदिनांक- १३,१९.**

## रागावर नियंत्रण ठेवावे लागेल

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात सुरुवातीला कोणत्याही प्रकारच्या आर्थिक गुंतवणुकीसाठी या राशीच्या लोकांनी अत्यंत सावधगिरीने पुढे जावे. या क्षेत्रातील तज्ज्ञ किंवा तज्ज्ञांकडून सल्ले घेऊन कोणतेही कार्य केले तर यश त्यांना नक्कीच यश मिळेल. सामाजिक जीवनासाठीदेखील हे वर्ष चांगले ठरेल आणि त्या व्यतिरिक्त आपण आपले वैयक्तिक संबंध अधिक अनुकूल बनवू शकता. तुम्हाला हे लक्षात ठेवायला पाहिजे की प्रेम आणि नातेसंबंध ओळखी, आपुलकीने आणि प्रेमाने चालतात. कोणत्याही नात्यात हट्टीपणा करून कोणतीही कृती करू नका. आपल्या सभोवताल चांगले वातावरण तयार करण्यावर आपले सर्व लक्ष केंद्रित करा. आपल्या आजूबाजूची काळजी घ्या, कारण असे काही लोक आहेत जे आपले नुकसान करण्याचा विचार करीत आहेत, त्यांच्यापासून सावध राहा. आपण करारावर सही करण्यास जात असल्यास, त्यातील प्रत्येक विषय वाचा आणि कोणालाही हमी द्या घेऊ नका. **महिलांना-** आपणास आपला रागही नियंत्रणात ठेवावा लागेल, कारण आपण एखाद्या कारणावरून वेळोवेळी भांडणे किंवा वाद घालू शकता. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. **शुभदिनांक- १४,१८.**

## आव्हानांचा सामना करावा लागेल

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात आपल्या कामाची प्रशंसा केली जाईल. या राशीच्या लोकांना या सप्ताहात काही आनंद आणि काही आव्हानांसह पुढे जावे लागणार आहे. आपण प्रत्येक आव्हानाला दृढपणे सामोरे जाण्यास सक्षम झाल्यास तर या कालावधीत उत्कृष्ट होण्यास कोणीही रोखू शकणार नाही. या सप्ताहात आपणास काही क्षेत्रात आव्हानांचा सामना करावा लागेल, विशेषत: आपले आरोग्य आणि करिअर यात आव्हान असेल. हे दिवस प्रेमजीवनासाठी अनुकूल ठरू शकते, त्याच प्रमाणे कौटुंबिक जीवन, विवाहित जीवन, विवाह, मुले, शिक्षण आणि आर्थिक परिस्थितीसाठी खूप अनुकूल ठरू शकते. याचा प्रभाव मुख्यतः आपले आरोग्य आणि आपल्या मुलांवर होईल. कधी कडू गोड प्रसंगाने आपले विवाहित जीवन उतार-चढावने भरलेले असेल. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, वादाचे प्रसंग टाळावेत आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक- १५,१६.**

## आरोग्याची काळजी घ्या

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात आपण थोडे आराम अनुभवाल आणि आरोग्यावरही त्याचा महत्त्वपूर्ण परिणाम होईल. सुरुवातीपासूनच ग्रह तुमच्या राशीला चांगले परिणाम देतील. विशेषतः हा कलावधी आपल्या आरोग्यावर आणि खर्चांवर परिणाम करेल आणि आपला खर्च अनपेक्षितपणे वाढू शकेल. काही वेळा अति घेतलेला ताण आरोग्याच्या कारणास्तव त्रास देऊ शकते. परंतु, सध्याची ग्रह स्थितिची सकारात्मक बाजू अशी आहे की जर आपण परदेशात जाण्यास तयार असाल तर तुमची इच्छा पूर्ण होऊ शकते. विशेषत: आखाती देशांमध्ये आपण सहजपणे प्रवेश करण्यास सक्षम असाल. ग्रहांचा आणखी परिणाम मुख्यत: तुमच्या शिक्षणावर, तुमच्या मुलांवर, तुमच्या प्रेमाच्या आणि तुमच्या शारीरिक सुखांवर परिणाम होईल. आपण आपले वाहन घेण्यास सक्षम असाल. **महिलांना-** त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन मिळेल. आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. **शुभ दिनांक - १७,१९.**

## विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा

**धनु :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता, या कालावधीत नोकरी बदलण्यापासून तुम्हाला बरेच फायदे मिळू शकतात आणि हा बदल तुमच्या कारकीर्दीसाठी खूप चांगला असल्याचे सिद्ध होईल. दुसरीकडे, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची संधी मिळू शकते. या काळात बऱ्याच परीक्षांमध्ये विद्यार्थी चांगली कामगिरी करतील आणि परिणाम म्हणून खूप चांगल्या गुणांसह उत्तीर्ण होतील. जर आपण काम करत असलात, तर आपल्याला आपल्या कामाकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल अन्यथा आपल्याला आपल्या कार्यालयात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. या राशीच्या लोकांना सप्ताहात व्यवसाय भागीदारीत अनेक आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. परदेशी व्यापारी लोकांसाठी वर्ष खूप अनुकूल ठरू शकते. यामुळे बरेच परदेशी संपर्क स्थापित केले जातील, जे आपल्याला दूरगामी लाभ देतील आणि आपल्याला समाजात चांगले स्थान मिळेल. **महिलांना-** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपल्या घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. **शुभदिनांक- १४, १६.**

## मिळकतीचे नवे पर्याय उपलब्ध होतील

**मकर :** हा साप्ताह मकरराशीसाठी ग्रहमान पाहता नोकरी व्यवसायात परिवर्तनामुळे घरापासून दूर राहावे लागेल. आपले कुटुंबीय एका मजबूत भिंतीसारखे तुमच्यासोबत ठामपणे उभे राहतील. विद्यार्थ्यांसाठी वेळ अनुकूल आहे. स्पर्धेचा निकाल आपल्याला प्रसन्न करेल, ही विद्यार्थी वर्गासाठी चांगली बातमी आहे. मिळकतीचे नवे पर्याय उपलब्ध होतील. प्रॉपर्टीत गुंतवणूक करणे फायद्याचे ठरेल. ऑफिसमध्ये सह-कर्मचारींचे वागणे सहाय्यभूत ठरेल. कुठे तरी बाहेर जाण्याचा कार्यक्रम ठरू शकतो. जोडीदारासोबत खास क्षण घालवू शकाल. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. **महिलांना-** संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा महिलांना घरबसल्या हा काळ उत्तम असून, त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. महिलावर्गाला सासुरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. **शुभदिनांक- १५,१७**

## कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका

**कुंभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता कारण आपल्याला एकापेक्षा जास्त स्रोतांकडून पैसे मिळण्याची शक्यता दिसते. कार्यालय किंवा कार्यालयात आपल्या हाताखालच्या लोकांवर अधिक विश्वास ठेवू नका कारण जर आपण असे केले तर ते आपल्या विश्वासाचा फायदा बेकायदेशीरपणे घेऊ शकतात आणि आपल्यास गुप्तपणे नुकसान करण्याचा प्रयत्न करतील ज्यामुळे कार्यालयातील आपली प्रतिमा खराब होऊ शकते. आपली जवळची माणसे घरी येतील त्यांची ऊठबस करावी लागेल, कामात असताना तब्बेतिकडे दुर्लक्ष करू नका, आपण आपली अस्मिता शुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **महिलांना-** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. आर्थिक बाजू ठीक राहील. कौटुंबिक वातावरण बिघडू देऊ नका. सार्वजनिक ठिकाणी आपले मतप्रदर्शन करण्याचे टाळावे. खिसा पाकीट भरलेले राहील. **शुभदिनांक - १७,१८.**

## तीर्थयात्रेचा लाभ होईल

**मीन :** राशीसाठी आपले या सप्ताहाचे ग्रहमान पाहता तुम्हाला इच्छेनुसार फळ मिळेल. जोडीदार प्रसन्न आणि अपत्य संतुष्ट राहतील. एकुणच तुमच्यासाठी हा चांगला सप्ताह आहे. कोणीतरी तुमच्यावर नजर ठेवून आहे. यासाठी आपले काम पूर्ण प्रामाणिकपणे करा. सावध राहा, मेहनतीचे फळ तुम्हाला नक्की मिळेल. पण ही वेळ विद्यार्थ्यांसाठी प्रतिकूल वेळ आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी मात्र सर्वकाही सामान्य राहील. म्हणजेच मेहनतीला पर्याय नसेल. नव्या लोकांच्या ओळखी होतील, ज्या पुढे लाभदायक ठरतील. नोकरीसाठी एखाद्या नव्या शहरात जाऊ शकता. अडकलेले धन परत मिळेल. वसुली करून घ्या. जोडीदार तुमच्यासाठी धावून येईल, त्याचे प्रेम सिद्ध होईल. जोडीदाराचे तुमच्याप्रतीचे वागणे सहाय्यकारी असेल. स्पर्धेला घाबरू नका, त्याचा आनंद लुटा. मग पाहा काम करताना किती मजा येते ती. **महिलांना-** धार्मिक कृत्यांप्रती रूची वाढवाल. तुमच्या जीवनात काहीतरी नवे होणार आहे. वाटेत काही अडचणी येतील, पण तुम्ही त्या पार कराल. कुटुंबात वातावरण ठीकठाक राहील. तीर्थयात्रेचा लाभ होईल. **शुभ दिनांक-१४,१६.**

# लोककल्याणाच्या योजना आखायला हव्या!

**लोकानुनय करणाऱ्या योजनांमुळे जर तिजोरी रिकामी होत असेल, राज्य कर्जबाजारी होत असतील, तर ऋण काढून सण साजरा करणाऱ्यांसारखी आपली स्थिती होईल. देशातल्या अनेक राज्यांनी लोकानुनय करण्यासाठी तांदूळ, डाळी तेलासाठी लोकांना पैसे देऊन राज्याचे अर्थकारण कर्जावर आधारित करून ठेवले आहे. आपल्या राज्यांनी समाजातल्या सर्व स्तरांना सामावणाऱ्या योजना आर्थिक शिस्त पाळून आखायला हव्या आहेत. विकासकामे रखडली तर राज्याच्या विकासाला खीळ बसते आहे.**







लोकशाही, लोकराज्य या शब्दांच्या गोंडस आवरणाने राजकारण आपल्या अवतीभवती वावरताना दिसत आहेत. आपल्याला वाटेल तेव्हा घटनेबाबत बोलायचे, संविधानाबद्दल बोलायचे आणि जेव्हा वाट्टेल तेव्हा संविधान आणि घटनेच्या विरूद्ध कृती करून मोकळे व्हायचे. एकीकडे राजकारणाच्या साधनशूचितेबाबत गप्पा हाकायच्या आणि दुसरीकडे समाजकंटकांना, गुंडांना आपल्या टोळीत सामावून घ्यायचे आणि त्यांना शुद्ध केल्याचा आव आणून राजकारणासाठी साधन बनवायचं. आपल्या देशाच्या राजकीय धोरण, राज्यकर्ते याबाबत पुन्हा कधीतरी बोलूया! आपण आपल्या राज्यातल्या बाबींबाबत सध्या तरी बोलूया.


आपल्या राज्यात कोणत्या समस्या आहेत की नाही याबाबत शंका निर्माण झाल्या आहेत. एकीकडे उद्योगधंदे, शेतकरी, लघुउद्योजक, मत्स्यव्यवसाय, लघुव्यवसाय, शैक्षणिक प्रश्न या साऱ्यांचा गदारोळ दिसून येत आहे. फक्त लोकांना आकर्षित करायचे मनाचा गल्ला भरण्यासाठी राज्याची तिजोरी रिकामी करायचे उद्योग राज्यकर्त्यांनी चालवले आहेत. समाजातील कष्टकरी, कामकरी यांना रोजगार, किमान मोबदला याबाबत सरकारने नक्कीच काहीतरी करायला हवे आहे. शेतकरी राजा निसर्गाचा प्रकोप, वातावरण बदल यामुळे हतबल होत असेल तर शासनाने त्याला बळ द्यायला हवे आहे. आजारी उद्योगासाठी प्रगतीपथावर आणण्यासाठी योजना आखायला हव्या आहेत. पण, याच्याऐवजी 'लाडकी बहीण'सारखी योजना आणायची आणि ही योजना राबवण्यासाठी राज्याचे अर्थकारण डबघाईला आणायचे प्रयोग चालू आहेत. राज्यात आर्थिक सुबत्ता असती तर हे प्रयोगसुद्धा करायला हरकत नव्हती, पण केवळ मतांचे राजकारणासाठी लोकांना आकर्षित करणाऱ्या योजना राबवणे म्हणजे राज्याला खड्ड्यात घालण्यासारखेच आहे. आपल्या घरात, कुटुंबात, उद्योगात एक विशिष्ट अर्थकारण असते. पगारदार असेल तर पगाराची रक्कम खर्च, करमणूक, बचत यांत विभागली जाते. उद्योजक आपला नफासुद्धा असाच वापरायचा ठरवत असेल, पण 'आमदानी अठन्नी खर्चा एक रूपया' असा प्रकार कोणी करत असेल तर मात्र अशा गोष्टीला 'कामातून गेला' असाच उच्चार करू शकतो. अर्थसंकल्प मार्च २०२५ रोजी सादर झाला. राज्याच्या वित्त, नियोजन, खर्च कर उत्पन्न या सर्वांची कुंडल्या अर्थमंत्र्यांनी मांडली पण हा अर्थसंकल्प मांडल्यानंतर तीन महिन्यांतच आपल्या देशातील अर्थकारणाने मोठे असलेले महाराष्ट्र राज्य ५७ हजार कोटी पुरवण्या मागण्या सादर करते आहे. लोकांना मतासाठी आकर्षित करण्याची योजना फक्त महाराष्ट्रातच राबवली जाते असे म्हणता येणार नाही. पण लोकांच्या मर्जीसाठी लोकांच्या मर्जीची मते राखण्यासाठी योजना आखणारी अनेक राज्य डबघाईला चालली आहेत. ४५ हजार तुटीचा अर्थसंकल्प आपण मांडला होता आणि त्यात ५७ हजार कोटींच्या पुरवण्या मागण्या यामुळे अर्थसंकल्पीय तूट ही एक लाख कोटीच्या वर गेली आहे. राज्य कर्जाच्या खाईत खोल खोल बुडत चालले असल्याचे चित्र अस्वस्थ करणारे आहे. 'लाडकी बहीण'सारखी योजना महिन्याला साडेतीन चार हजार कोटींचे वाटप करायला भाग पाडत आहे. ही योजना चालू ठेवण्यासाठी सामाजिक न्याय, आदिवासी विकास अशा दुर्बल घटकांच्या विकासाच्या योजनांसाठी असलेला निधीसुद्धा वापरला जातो आहे. आजच्या क्षणाला ग्रामविकास, शहर विकास नगरपालिका याकडे आर्थिक पाठबळांमुळे योजना राबवण्याचा अनुभव दिसून येत आहे. लोकांची मर्जी राखून मत मिळविणे या विकृत साधनेबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया पूर्वीच्या नियोजन आयोगाने वेळोवेळी इशारा दिला होता. लोकानुनय करणाऱ्या योजनांमुळे जर तिजोरी रिकामी होत असेल, राज्य कर्जबाजारी होत असतील, तर ऋण काढून सण साजरा करणाऱ्यांसारखी आपली स्थिती होईल. देशातल्या अनेक राज्यांनी लोकानुनय करण्यासाठी तांदूळ, डाळी तेलासाठी लोकांना पैसे देऊन राज्याचे अर्थकारण कर्जावर आधारित करून ठेवले आहे. आपल्या राज्यांनी समाजातल्या सर्व स्तरांना सामावणाऱ्या योजना आर्थिक शिस्त पाळून आखायला हव्या आहेत. विकासकामे रखडली तर राज्याच्या विकासाला खीळ बसते आहे. राज्यातल्या ग्रामविकास विभाग, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभागांना यातील कंत्राटदार, ठेकेदार यांना केलेल्या कामाचे पैसे मिळाले नाहीत म्हणून नवीन कामे करीत नाही. नवीन कामे नाही तर राजकारणातले विकास पुरूष कसे निर्माण होणार? आर्थिक शिस्त पाळण्यासाठी उपाययोजना करण्याची वेळ साधायला हवी. वेळ मारून नेण्यासाठी पुरवण्या मागण्या मंजूर होणे ठिक आहे. पण कठोर आर्थिक शिस्त, नियोजन आखून केवळ राज्यहित लक्षात ठेवून योजना आखायला हव्या. योजना आर्थिक तडजोडी लोकाभिमुख असाव्यात. लोकानुनय करणारे नको. आज राज्यभरात 'सुपर एक्स्प्रेस महामार्ग' पायाभूत सुविधेबाबत निर्मिती याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. हे का? आणि कशाला? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची गरज नाही. आता, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जाहीर होतील यासाठी मतांच्या बेरजेसाठी योजना आखणे आलेच. स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदानाचा लाडू भरवणे गरजेचे झाले आहे. यासाठी पुरवण्या मागण्या मंजूर करणे महत्त्वाचेच ठरणार आहे.





दुर्लक्षिलेला, वर्षानुवर्षे न्यायाच्या प्रतिक्षेत असलेला शेतकरी, मजूर वर्ग यांच्यासाठी शेतीपिक योजना, शेती कर्ज, कमाल वेतन इ. योजना सोप्या पद्धतीने केली गेली पाहिजे. या घटकांबरोबर राज्यात विकासाभिमुख वातावरणाची निर्मिती करायला हवी. नको असलेले मुद्दे, टाकाऊ विचारसरणी राबविणारे राज्यकर्ते नको आहेत. गरज नसताना, भाषावाद, राजकारण, आरक्षण गोंधळ टाळायलाच हवा. प्रशासनाचा गैरवापर विरोधकांना ठेचण्यासाठी न करता सार्वत्रिक कल्याणासाठी राज्याच्या हितासाठी करायला हवा आहे. लाडके भाऊ, लाडकी आई, लाडकी सर्व नाती असायला हवे. त्यांचे लाड आपल्या व्यक्तिगत स्तरावर पुरवावेत, फक्त आपण राज्यकर्ते आहोत म्हणून राज्याची तिजोरी रिकामी करणाऱ्यांना जनता लाडका मुख्यमंत्री 'लाडका नेता' म्हणणार नाही एवढे लाडका/लाडकी ब्रँड तयार करणाऱ्यांनी लक्षात ठेवायला हवे. **

# सरी येता धावून...



**ऋतूंचे चक्र पाळणाऱ्या भारतासारख्या निसर्गरचनेमध्ये पाऊसकाळाचे महत्त्व वादातीत आहे. यंदा वेळेपूर्वीच दाखल होऊन त्याने आश्चर्याचा धक्का दिला. मात्र मुसळधार सरी आणि बेशिस्त वर्तन यांचे समीकरण कधीच जुळत नसल्याचा फटका गल्लीपासून यात्रेसाठी दुर्गम भागात जाणाऱ्या श्रद्धाळूंपर्यंत सगळ्यांचा बसत आहे. अमेरिकेतही पुराचे थैमान आहे. या पार्श्वभूमीवर पावसाळ्यातील संकटांविषयी बोलावे लागेल.**

अरुण बापट

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर येण्याच्या, वस्तीमध्ये पाणी शिरुन कठीण प्रसंग ओढवण्याच्या, जनजीवन विस्कळित होण्याच्या तसेच दरडी कोसळून मोठे अपघात घडण्याच्या अनेक घटना घडतात. धबधब्यांचा आनंद लुटण्यासाठी गेलेले अनेकजण अडकल्याच्या वा वाहून गेल्याच्या बातम्याही वारंवार वाचनात येतात. सध्या आपण अशा घटनांचा कानोसा घेत आहोतच. अशा आपत्तीमुळे अमेरिकेतही अनेकांना जीव गमवावे लागण्याची घटना ताजी आहे. तेथील टेक्सासमध्ये ७० जण पुराच्या पाण्यात वाहून गेले. त्यामुळेच पावसाळ्यातील वाढते धोके आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने येणारा विषय चर्चेच्या केंद्रस्थानी घ्यायला हवा.

पूर, भूस्खलन वा अन्य दुर्घटना हे सगळे निसर्गात वेगाने घडणाऱ्या बदलांचे परिणाम असून त्याविषयी चर्चा करण्यासाठी १९७० मध्ये स्टॉकहोम येथे चर्चा करण्यासाठी जाणकार, अभ्यासकांची परिषद आयोजित करण्यात करण्यात आली होती. अर्थात त्यावेळी लोकांनी या परिषदेची खिल्ली उडवली होती. त्यावर लोक हसले होते. या विषयात काहीही दम नसल्याचे काहींचे म्हणणे होते. पण काळानुरुप निसर्ग अधिक लहरी होत गेला. हळूहळू, परिणामांची तीव्रताही वाढत गेली आणि आज पर्यावरण तसेच वातावरणातील बदल ही जगातील सर्वात मोठी समस्या गणली जात आहे. वातावरणातील बदलामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. यामुळे जीवसृष्टीचा नाश होण्याचा मोठा धोका आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पुराचे वाढते प्रमाण हा काळजीचे आणि मोठ्या प्रमाणात जीवित तसेच वित्तहानी होण्याचे कारण ठरत आहे. २००३ मध्ये अशाच प्रकारे मुंबईमध्ये मोठा पूर आला होता. तेव्हा एका दिवसात तब्बल ८००-९०० मी.मी. पाऊस पडला होता. त्या पुरात अडकणाऱ्यांमध्ये मीदेखील होतो. मी सलग दोन दिवस कारमध्ये बसून काढले होते. सध्याची स्थिती त्यापेक्षाही गंभीर असून त्याचे घातक परिणाम दिसत आहेत. हिमाचल प्रदेशमध्ये पूर्वीही भूस्खलन व्हायचे. पण आता त्याची संख्या तसेच व्याप्ती वाढली आहे. म्हणजेच पूर्वी छोटा भाग खाली यायचा, मात्र आता डोंगराचा मोठा भाग जमिनीवर येतो आणि दुर्घटनांना आमंत्रण मिळते. म्हणूनच ही बाब अधिक काळजीची बनते.

दुसरी बाब म्हणजे आधी कधीही पूर येत नसलेल्या ठिकाणीही आता पूरस्थिती निर्माण होताना दिसत आहे. जसे की, मध्यंतरी कुवेतमध्ये पूर आला होता. परिस्थिती गंभीर होत असल्याचे हे निदर्शक आहे. यावर चर्चा करण्यासाठी जगभर अनेक परिषदा आयोजित होतात. पण त्यावर कोणतीही ठोस कृती होत नाही, ही काळजीची बाब आहे. हिमालयातील नद्यांचे प्रवाह आणि त्या भागात होणारे भूकंप याचा आपल्याला मोठा धोका आहे. नेपाळमध्ये भूकंप झाला की आपल्याकडे त्याचे परिणाम प्रचंड प्रमाणात दिसतात. तिकडच्या नद्यांना पूर आला तर आपल्याकडे धोका उत्पन्न होतो. उदाहरणार्थ, बिहारमधील कोसी नदीने बदललेला मार्ग. १०० वर्षांमध्ये ती १२० किलोमीटर पूर्वे कडून पश्चिमेकडे असे वळण बदलते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पूर येतो. खेरीज ही नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी आपण काहीही करु शकत नाही. अशाच प्रकारे हिमालयातील जंगलांमुळेही आपल्याकडे अनेक नैसर्गिक संकटे येतात आणि यापुढेही ती येत राहणार आहेत.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे केवळ भारतातच नव्हे तर, जगाच्या अनेक भागांमध्ये हा धोका वाढतो आहे. टेक्सासमधील पुराची चर्चा सध्या जगभर होत आहे. मात्र मिसिसीपी राज्यही पुरासाठी ओळखले जाते. मिसिसीपी नदीमुळे तेथे वारंवार ही परिस्थिती उद्भवते. हे वातावरणातील बदलांचेच परिणाम आहेत. म्हणूनच अमेरिका आणि कुवेतप्रमाणेच युरोपमध्ये नेदरलँडसारख्या ठिकाणी पूर आला. अर्जेंटिनामध्येही आला. खरे तर तेथे खूप मोठे जंगल आहे. मुख्य म्हणजे कापले नसल्यामुळे ते सुस्थितीत आहे. पण असे असूनही हा भाग पूरप्रवण होता असेल तर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. यावर अनेक उपाय सुचवले जातात. कोणी नद्यांवर धरणे बांधण्याचा सल्ला देतो तर कोणी नद्यांवर झाडे लावण्याचा सल्ला देतो. मोठ्या प्रमाणावर झाडे कापली जात असल्यामुळे पूर येतो, असे त्यांचे म्हणणे असते. मात्र ही मते कितपत योग्य आहेत, याचाही विचार करायला हवा, कारण अगदी रामायण काळातही पूर येत असल्याचे पौराणिक कथांमधून समजते. भारतात १७३७ मध्ये सर्वात मोठा पूर आल्याचा संदर्भही इतिहासाचा अभ्यास करताना आढळतो. यामागे हा पूर आलेल्या बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात झाडे कापल्याचे कारण देण्यात आले होते. पण यात तथ्य वाटत नाही. कारण पाऊसच नव्हे तर कोणतीही नैसर्गिक घटना आपल्याला अडवता येत नाही, हे वास्तव आहे. धरणांमुळे पाणी अडवता येत असले तरी जास्त प्रमाणात पाणी जमा झाल्यास विसर्ग करावाच लागतो आणि मोठ्या प्रमाणात विसर्ग केल्यास पूर येतोच येतो. आपल्याकडे पावसाळ्यात कोयना, वारणा आदी नद्यांना मोठा पूर येतो आणि जनजीवन व्यस्त होते. हीच बाब राज्यांमध्ये अनेक भागांमध्ये पाहायला मिळते. देशाच्या उत्तर भागामध्ये पावसाचे रौद्र रुप बघायला मिळते. त्यातही अनेक हिंदू देवदेवतांची ठिकाणे या प्रदेशातील दुर्गम भागात असल्यामुळे भर पावसाळ्यातही अनेक यात्रेकरु तेथे जातात. अशा सगळ्यांनीच धोका लक्षात घ्यायला हवा. प्रशासन आपल्या पातळीवर सगळी व्यवस्था चोख ठेवतच असते. याचाच भाग म्हणून जथ्यामध्ये किती भाविकांचा सहभाग असावा, हे ठरवून तीच तुकडी पुढे पाठवली जाते. नियमनाच्या दृष्टीने ही बंधने गरजेची आहेत. मात्र प्रवास करु इच्छिणाऱ्यांना पुराचा, भूस्खलनाचा धोका लक्षात घेऊनच तिथे जाण्याचा निर्णय घ्यायला हवा.



आपल्या देशाच्या नैऋत्येला बंगालजवळ प्रचंड वादळे तसेच मोठा पाऊस येतो. या धोक्याचा सामना करण्याच्या दृष्टीने, आपत्ती व्यवस्थापनेच्या दृष्टीने तेथे बरेच काम केले गेले असून आजही ते सुरूच आहे. देशाच्या अनेक भागांमध्ये अशा पद्धतीची कामे सुरू आहेत. सर्वप्रथम ओरिसाने यात पुढाकार घेतला. या राज्याने त्या भागामध्ये पुरापासून संरक्षण देणाऱ्या इमारतीचे निर्माण केले आहे. यात पूरग्रस्तांसाठी सोय केली जाते. एक इमारत साधारणत: तीन मजिल्यांची असते. त्याला लिफ्टची सोय नसते तसेच खालचा भाग बराच विस्तीर्ण असतो. या जागी लोक आसरा घेऊ शकतात. तेथेच त्यांच्या जेवण्या-खाण्याची, पिण्याच्या पाण्याची सोय केली जाते. म्हणजेच पुरात घरे वाहून गेलेल्यांना या संरक्षक इमारतींचा आसरा लाभतो. ओरिसानंतर तमिळनाडू, आंध्रमध्येही पूरव्यवस्थापन करण्यासाठी अशा पद्धतीच्या नियोजनाचे मोठे काम केले जाते. आपल्याकडेही फार मोठ्या नसले तरी काही प्रमाणात ते केले जाते. थोडक्यात, आपण आपत्ती थांबवू शकत नसलो तरी तिचा सामना करण्यासाठी आणि सुरक्षित राहण्यासाठी काही उपाय योजू शकते. तेव्हा त्याकडे अधिक कटाक्षाने लक्ष पुरवणे गरजेचे वाटते.

महाराष्ट्रात बरेच ठिकाणी भूस्स्खलाचे प्रकार घडतात. दरडी कोसळतात. रस्ते बंद होतात. या अर्थाने पावसाळ्यात कोकणातील बराच भाग धोक्याचा ठरतो. अगदी गावेच्या गावे ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्याच्या घटनाही आपण अलिकडे पाहिलेल्या आहेत. हे लक्षात घेता भूस्खलन होण्याचे संकेत मिळतात का, याचाही विचार वा अभ्यास व्हायला हवा. पावसाळ्यात कोकणात जाताना वा मुंबई-पुणे प्रवास करताना आपण धबधबे पाहतो. त्याचा आनंद लुटतो. पण यावेळी थोडे लक्ष दिले तर धोक्याचे संकेतही लक्षात येऊ शकतात. जसे की, पावसाचे पाणी खडकांवर आपटून खाली पडताना पांढऱ्या रंगाचे असेल तर भूस्खलन होणार नाही, असे समजावे. मात्र एखाद्या ठिकाणी मातकट रंगाचे पाणी जमिनीवर पडत असेल तर तेथे भूस्खलानाचा धोका लक्षात घ्यायला हवा. याचे कारण, खडकांमध्ये आधीच भेगा पडलेल्या असतात. अशा भेगांमधून पाणी खाली येते तेव्हा भेग रुंदावते आणि तो संपूर्ण भाग रस्त्यावर कोसळू शकतो. म्हणूनच पावसाळ्यात प्रवास करताना यावर लक्ष ठेवावे. पाण्याचा प्रवाह कधीही वाढू शकतो, हे लक्षात घेऊन खूप आतमध्ये वा दुर्गम भागामध्ये जाण्याचे धाडसही टाळायला हवे. सध्या अनेकजण सेल्फी घेण्यासाठी वा रिल करण्यासाठी जीव धोक्यात घालताना दिसतात. पुराच्या पाण्यात उड्या घेणारे अनेकजण दिसतात. काही कुटुंब लहानग्यांना घेऊन प्रवाहाच्या जवळ जातात. हे सगळेच अपघातांना आमंत्रण देण्याचे प्रकार आहेत. ते टाळायला हवेत. कितीही आपत्ती व्यवस्थापन केले तरी अशा अतिउत्साही लोकांपुढे ते कमीच पडेल आणि दुर्घटना टळणार नाहीत. तेव्हा हा मोह टाळायला हवा.

**(शब्दांकन : स्वाती पेशवे)**

# गण्या आणि त्याचं कर्जाविषयीचं तत्त्व

निलेश साठे

गण्या माझा शाळेतला दोस्त आहे. नाव गणेश पण गण्याच म्हणतात त्याला सगळे. गण्याचं स्वतः चं असं एक तत्व आहे. वयाच्या ३५ व्या वर्षी स्वतःचं घर स्वतःची बायको स्वतःची दोन मुलं एक दुचाकी आणि एक चार चाकी आणि सहा महिने बसून खाता येईल इतकाच बँक बॅलन्स. हेच त्याच्या सुखी संसाराचं स्वप्न. याच्यापेक्षा जास्त माणसाने कमवूही नये असं त्याचं वैयक्तिक मत. कशाला कमवायचं म्हणे. कर्जाच्या तर तो सक्त विरोधातच आहे. कर्ज माणसाने मुळात काढूच नये. कर्जाच्या ओझ्याखाली माणसाने का दबावं. जीवन हलकं फुलकं आणि मस्त जगून घ्यावं. जीवनाचा काही नेम नाही.

अरे पण कर्ज नाही काढलं तर माणसाची प्रगती कशी होणार.

त्यावर तो म्हणतो, कर्ज घ्यायचंच कशाला. जी वस्तू घ्यायची ती अगदी रोख रखमेने.

एखादी मोठी रक्कम आपल्याकडे नसेल तर कष्ट करा, मेहनत करा, रात्रंदिवस मेहनत करा. एखादी वस्तू दोन-चार महिने उशिराने घ्या, पण रोख खरेदी करूनच घ्यायची.

तो बहादर क्रेडिट काढला तर भिकाडेपणाचे लक्षण मानतो. उधार मागण्याचा नवीन फंडा बाजारात आणलाय म्हणतो. काही लोक दहा हजार रुपयांचा मोबाईल सुद्धा ईएमआय वर घेतात. त्यावर तो म्हणतो अरे मग माणसाचा जीव कशाला पाळलाय. दहा हजार रुपयाची वस्तू तुम्ही रोख रकमेने घेत नसाल त्यासाठी तुम्ही ईएमआय चा वापर करत असाल तर तुम्ही माणूस म्हणून काय केलं. दोन-चार महिने थांब, नंतर घे, काही नडले का त्यापासून.

एखाद्याला घर घ्यायचं असेल गाडी घ्यायची असेल आणि एवढी मोठी रक्कम जर त्याच्याकडे नसेल तर त्यानं काय करावं बरं.

जर तुमच्याकडे वडिलोपार्जित घर असेल तर तुम्हाला घर घ्यायची खरं तर गरज नाही. जी गोष्ट तुमच्याकडे नाहीये फक्त तीच गोष्ट घ्या. गाडी सुद्धा घेताना माणसाने शक्य तेवढे रोख रकमेचाच विचार करावा.

अरे पण असं का?

एकदा मनुष्य कर्जाच्या विळख्यात अडकला की कर्जावर कर्ज, कर्जावर कर्ज, असं तो कर्जाच्या जाळ्यात अडकत जातो. कर्ज काढल्यामुळेच तर घर किंवा गाडी घेता येते ना. असं तुला वाटते.

एकदा कर्ज घेऊन घर घेऊन बघ. ज्या घराला तू माझं घर माझं घर म्हणतोस ना. ते घर तुझं नुसतंच मुळी. घराचे एक दोन हप्ते चुकवून बघ तुला कळेल घराचे मूळ मालक कोण आहे. जोपर्यंत तू वीस पंचवीस वर्षे घराचे पूर्ण हफ्ते फेडत नाहीत तोपर्यंत ते घर तुझ्या बँकेचे असते. त्या तो एवढा मोठा कालावधी, मध्येच जीवाचं काय झालं तर झालं सगळं टाय टाय फिश. कोणी एवढा जिवाचा आटापिटा करायला सांगितलय. ज्याला तू माझं माझं म्हणतोस ना, तेसुद्धा तुझं नाही. ज्या घराला तू माझं घर माझं घर म्हणतोस शंभर वर्षांनंतर त्या घराचा तिसराच कुणीतरी मालक असेल. माणसाचे एकूण आयुष्य आहे तरी किती. मुश्किलने मनुष्य ६० वय पार करू लागला आहे. कोणतीही गोष्ट योग्य वयात योग्य वेळी भेटली तरच त्याला किंमत आहे मित्रा. अन्यथा सगळे वायफळ.

ते कसं काय?

तुझ्या तोंडात दात नाहीत आणि तुला पेरू खायला दिले खाशील.

नाही.

उतार वयात ऐश्वर्या रायशी लग्न करायला सांगितलं तर करशील?

ती का उतार वयाचा शोधेल.

तेच तर सांगतोय. ज्या त्या वेळेत जी ती वस्तू भेटली पाहिजे तरच तिला किंमत आहे. म्हणून सांगतो मित्रा मेहनत कर काबाडकष्ट कर रात्रंदिवस घाम गाळ जे काय घ्यायचं जे काय मिळवायचे ते वय वर्ष ३५ पर्यंतच. मिळवूही शकतो आणि उपभोग ही घेऊ शकतो. या वयातच सर्व काही करायचं.

पिढ्यान् पिढ्याने बसून खाल्ले पाहिजे, अशा तुमच्या मानसिकतेने तुमची पिढी आळशी तर बनणारच, त्यांच्याने काही होणार तर नाहीच पण तुमचेही आयुष्य ते बरबाद करून टाकणार.

असं कसं म्हणतोस, आपण कुणासाठी करतो?

स्वतःसाठी जग मित्रा, स्वतःसाठी जग. कोणी नाही कोणाचं. इतरांच्या इच्छा, अपेक्षा, स्वप्नपूर्ती करता करता तुझं आयुष्य संपून जाणार, एवढं मात्र नक्की.

आजकाल सर्व सामान्य माणसांना तर चार चाकी गाडी घ्यायची गरजच नाही. असे काही ॲप आलेत की एक फोन केला तर एसी गाडी पाच मिनिटात दारात उभे राहते ड्रायव्हर सहित. मग कशाला हवी स्वतःची गाडी. मस्त मजेत पण शिस्तीत जगून घेऊ ना रं भाऊ. मेहनत करायची पैसा वाचवायचा आणि जी गोष्ट घ्यायची आहे ती सरळ खरेदी करून टाकायची. पैशांचं योग्य नियोजन केलं आणि योग्य ठिकाणी थोडीफार गुंतवणूक केली तरी बऱ्याच अडचणी दूर होतील. कर्जाच्या भानगडीत पडायचं नाही. आपण कर्जात बुडतो आणि कर्ज देणारा मात्र बक्कळ पैसा कमवून बसतो. तेव्हा नो कर्ज.

बस कर बाबा तुझं तत्त्वज्ञान. वेळप्रसंगी कुठला नातेवाईकही कामी येत नाही, मित्रपरिवार काम येत नाहीत, तेव्हा कर्ज हे तर घ्यावंच लागतं.

बघा ना काहीही बोलतो.

**



# ‘रिल्स ग्लासमधल्या हळद पाण्याचं रिकामटेकडेपणा की वेडसरपणा?’

**धनंजय शेटये**

आजकालच्या फेसबुकवरच्या आणि इन्स्टाग्रामवरच्या रिल्सचा धुमाकूळ पाहायला मिळत आहे. कधी कधी अर्थहीन, मुर्खपणा दर्शविणारे रिल्स लोकांच्या रिकामटेकड्या वृत्ती बद्दल हसू येतं. एकाने केले की दुसरा करतो, दुसऱ्याने केले की तिसरा अशी साखळी वाढत जाते. पण आपण का? आणि कशासाठी करतो हे मात्र त्यांचे त्यांनाच ठाऊक?

ग्लासमध्ये हळद टाकण्याचे रिल्स: सार्वत्रिक वेडसरपणाची नवी उंची

कालपर्यंत जे सोशल मीडियावर फक्त ‘गुड मॉर्निंग’ म्हणायचे, ते आज हळदपाणी साधनेचे उपासक बनले आहेत. हळद टाकतानाचा हाताचा कोन, ग्लासचा पारदर्शकपणा, आणि त्यामधून उमटणाऱ्या बुडबुड्यांचा आध्यात्मिक अर्थ याचं आता स्वतंत्र विश्लेषण केलं जातंय.

कित्येक वर्षांपासून हळद ही फक्त जेवणात वापरली जायची. तर कधी पोळ्याच्या भाजणीला रंग द्यायची, किंवा खरचटलेल्या गुडघ्याला लावायची. तर लग्नसोहळ्याच्या पूर्वसंध्येला हळदीच्या कार्यक्रमाला बेधुंद नाचायचं. खरंतर, ही लग्नाच्या पूर्वसंध्येला हळदीची परंपरासुद्धा आगरी समाजाची होती. पण, आता सर्वच समाज आवडीने स्वीकारतात. हे सर्व ठिक आहे त्यांत कौटुंबिक सोहळ्याचा आनंद द्विगुणित करता येतो. ‘पाण्यात हळद टाकणं’ हे पण आता का? हळद आयुर्वेद, इंस्टाग्राम फिल्टर नवयुगाचं औषध की मनोरंजनाच्या वेडसर दुनियेचा टाईमपास?

‘जग बदला, आधी ग्लासमध्ये हळद टाका’

ही रिल्स पाहताना वाटतं आपण जगाच्या ‘हळद क्रांतीत’ मागे पडलोय का? एका मुलीने तर हळद टाकून कॅप्शन दिलं होतं.

‘तुम्ही स्वतःला शोधताय का? तर पाण्यात हळद मिसळा. उत्तर काचेच्या तळाशी सापडेल.’ काय पण लोक तत्वज्ञान मांडतात.?

हळद आरोग्यासाठी चांगलं यात दुमत नाही. तुम्ही हळद मिसळताय हे पाचवीतल्या विज्ञानात बसणारा प्रयोग आहे.

हे सगळं बघताना एकच प्रश्न उरतो.

‘आपण खरंच इतके रिकामे आहोत का?’

की आता प्रत्येकाने जीवनाचं तत्त्वज्ञान चहा, हळद, साखर, किंवा पाण्याच्या थेंबातूनच शोधायचं ठरवलंय?

रिल्स करा, पण रिअल राहा

हळदपाणी प्या, हवं असेल तर त्याचे फायदे सांगा. पण त्याला अध्यात्मिक प्रदर्शन नको. हे रिल्स म्हणजे फक्त क्षणिक आकर्षण आहेत. त्यातून ज्ञान काढणं म्हणजे शेंगदाण्याच्या पोत्यातून मोती शोधणं.

ग्लासमधलं पाणी प्या आणि हो, हळद टाकायचं विसरू नका. पण कृपया त्याचा फोटो काढून फिलॉसॉफी पाजू नका. विचार करत राहा.

समोरचा ग्लास कधी रिकामा वाटतो, तर कधी भरलेला.

पण हळद कितीही टाकली,

‘आयुष्य समजून घ्यायला अजूनही पुस्तकेच उपयोगी पडतात.

‘बहुगुणी हळद : आयुर्वेदातली सोन्याहून अधिक मोलाची देणगी. हळद ही केवळ मसाला नसून ती भारतीय परंपरेत खोलवर रुजलेली, बहुगुणी औषधी वनस्पती आहे. संस्कृतमध्ये हळदला ‘हरिद्रा’असे म्हणतात, आणि आयुर्वेदात ती कफ, वात, पित्त संतुलित करणारी, शरीरशुद्धी करणारी व रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारी समजली जाते.

जंतुनाशक, व्रण भरून काढणारी, त्वचा उजळवणारी वरील सर्व गोष्टी हळदीला तिचे औषधी मूल्य देते.

हळदीचे सांस्कृतिक स्थान महत्त्वाचे आहे. शरीरशुद्धीपासून ते संस्कारांपर्यंत भारतीय संस्कृतीत हळद केवळ आरोग्यासाठीच नाही, तर शुद्धतेचे व मंगलतेचे प्रतीक मानली जाते.

लग्न समारंभामध्ये हळद समारंभ हा विवाहसोहळ्याचा एक महत्त्वाचा विधी आहे. यामध्ये वधू-वरांना हळद लावून शुभेच्छा दिल्या जातात. हे केवळ एक विधी नाही, तर शरीरशुद्धी आणि शुभारंभाचे प्रतीक मानले जाते.

धार्मिक पूजांमध्ये देवी-देवतांना हळद अर्पण करणे ही मंगलतेची निशाणी आहे.

विशेषतः दक्षिण भारतात हळद-कुंकवाचे महत्त्व फार मोठे आहे.

दैनंदिन जीवनात: ग्रामीण भागात आजही लोक जखमेवर हळद लावतात, चहा-धूप-फेसपॅकमध्ये तिचा वापर करतात. ती प्रत्येक गृहिणीच्या डब्यातली, स्वयंपाकघरातली ‘बायोडॉक्टर’ आहे.

हळद : जुने ज्ञान, नवे रूप

आजच्या काळात हळदचे महत्त्व आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहे. ‘गोल्डन मिल्क’ हे नाव देऊन पाश्चिमात्य जगात ती आरोग्यपेय म्हणून गाजते आहे. सौंदर्यप्रसाधनं, सप्लिमेंट्स, आणि औषधांमध्येही हळदला मानाचं स्थान मिळालं आहे.

हळद ही फक्त एका ग्लासात पडणारी घटक नाही, ती परंपरेत खोल रुजलेली, आयुर्वेदाची सुवर्णकळी आहे. तिचा उपयोग करताना आपण तिच्या सांस्कृतिक आणि औषधी मूल्यांबाबत जागरूक राहिलो, तर ही सोन्याहून पिवळी देणगी आपल्याला आरोग्य आणि परंपरेची दोन्ही साथ देईल. **


> **हळदीचे सांस्कृतिक स्थान महत्त्वाचे आहे. शरीरशुद्धीपासून ते संस्कारांपर्यंत भारतीय संस्कृतीत हळद केवळ आरोग्यासाठीच नाही, तर शुद्धतेचे व मंगलतेचे प्रतीक मानली जाते.**



वाचनीय ललित लेख

# सफर खूबसूरत हैं, मंजिल से भी

**पुस्तक परीक्षण**
**प्रा. शाम जोगळेकर**
मो. ९२७३३४३१७७




‘‘सफ़र खूबसूरत हैं, मंजिल से भी’’ हे वर्षा कुवळेकर यांचे पुस्तक पुण्याच्या विद्यार्थी प्रकाशनने देखण्या स्वरूपात प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला ज्येष्ठ विचारवंत, लेखक, संपादक, व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशनचे संचालक दिनकर गांगल यांची वेधक प्रस्तावना लाभली आहे. त्यांच्या मते, वर्षा कुवळेकर प्रसंगाप्रसंगांचे कथन ढोबळ स्वरूपाचे करत असल्या तरी त्या अनुभवांतील बारकावे टिपत असतात. त्यातून त्यांच्या लेखनास सूक्ष्मतरलता लाभते. त्यांचे हे पुस्तक म्हणजे अनुभवांचे प्रांजल बोल आहेत.

वर्षा यांनी आपले मनोगत थोडक्यात मांडले आहे. त्यांचे हे तिसरे पुस्तक साकारण्यासाठी, त्यांच्या अश्विनी या मैत्रिणीकडून प्रेरणा मिळाली. या पुस्तकात एकूण बत्तीस लेख समाविष्ट आहेत. पुस्तकाचे शीर्षक वाचून वाचक अंतर्मुख होतो. पुस्तकाचे अप्रतिम रंगीत मुखपृष्ठ श्रीकृष्ण ढोरे यांचे आहे.

‘मनभावन श्रावण’ या पहिल्या लेखात लेखिकेने बालपणापासून प्रौढावस्थेपर्यंतचा, जीवनाचा प्रवास करताना श्रावण महिन्यातील विविध आठवणी जागवल्या आहेत. श्रावण महिन्यातील विविध व्रते आणि सण विविध प्रदेशांत, शहरी आणि ग्रामीण भागात कसे साजरी केले जातात, त्याची माहिती या लेखातून वाचकाला मिळते. ‘‘वर्षा ऋतूतील हा सर्वात सुंदर काळ खराच !!’’ असेही शेवटी लेखिका लिहून जाते. उंबरठा, या लेखात काळानुसार स्त्री-पुरुषांच्या जीवनातील मर्यादा कशा बदलत गेल्या, हे उत्तम प्रकारे मांडले आहे. आजच्या काळात पिढीतील अंतर वाढल्याने समाजात निर्माण झालेल्या प्रश्नांकडेही या लेखाद्वारे लक्ष वेधले आहे. कर्नाळा, एक उनाड दिवस, केल्याने देशाटन त्या विविध लेखांतून, बालपणापासून प्रौढावस्थेपर्यंत केलेल्या भटकंतीचे विविध अनुभव लेखिकेने उत्तम प्रकारे मांडले आहेत. जीवनाच्या संध्याकाळी भटकंतीतील त्यावेळच्या विविध साथीदारांची आठवण तीव्रतेने येते. कारण त्यापैकी काही, आता कायमचे सोडून गेलेले असतात. ‘डहाणूचे दिवस’ या लेखात, लेखिकेने विवाहानंतर सहचराबरोबर थाटलेल्या पहिल्यावहिल्या संसाराची कहाणी सविस्तरपणे मांडली आहे. तेथील वेगळे वातावरण, प्रथमच घरातील स्वयंपाकाची पडलेली सर्व जबाबदारी आणि अन्य गोष्टींचे सविस्तर वर्णन लेखिकेने केले आहे. मैत्री, या लेखात लेखिकेने आपल्या आयुष्यातील, जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांतील लाभलेल्या मैत्रीची कहाणी सविस्तरपणे मांडली आहे. बालपण, तारुण्य आणि प्रौढावस्थेत वेगवेगळ्या ठिकाणी भेटलेल्या व्यक्तींशी, मैत्री कशी पक्की होत गेली, हे यामधून उत्तम प्रकारे स्पष्ट होते. वारी, विठू माउली, माउलींचे आवतण या लेखांत वारीतील विविध अनुभव लेखिकेने मांडले आहेत. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनाने काय वाटले ते भावपूर्ण अनुभव लेखिकेने उत्तम प्रकारे शब्दबद्ध केले आहेत.

पुस्तकं, हा लेख वाचनाची आवड बालपणापासून प्रौढावस्थेपर्यंत कशी विकसित होत गेली, हे लेखिकेने उत्तम प्रकारे मांडले आहे. सहचर, मित्रमंडळी यांच्यामुळे वाचन कसे बहरले आणि विस्तारले तेही या लेखातून कळते. ‘भातुकली’ या लेखात लेखिकेने आपल्या त्याविषयीच्या विविध आठवणी जागवल्या आहेत. सहचराची साथ सुटल्याने आणि मुलगा सहकुटुंब परदेशात असल्याने, पुन्हा एकट्याचा थोडासा स्वयंपाक करण्याची वेळ आली आणि पुन्हा जणु भातुकलीचा बालपणीचा खेळ सुरू झाला. १९७४ ची बॅच, या लेखात प्रौढपणी शाळा, महाविद्यालयातील मैत्रीचे बंध अजूनही कसे भक्कम झाले आहेत, हे वर्षा यांनी सविस्तरपणे मांडले आहे. त्या निमित्ताने होणारी विविध ठिकाणची भटकंती सर्वांनाच कशी नवी ऊर्जा देते, हे देखील स्पष्ट केले आहे. नर्मदा परिक्रमेच्या निमित्ताने लेखिकेला, तेथे भक्तांसमोर सतत हात पसरणारी मुले पाहून धक्का बसला होता आणि वाईटही वाटले होते. हृदयस्पर्शी, या लेखातील ‘‘नर्मदालय’’चे दीडशे मुलांना संभाळण्याचे कार्य करणाऱ्या पूर्वाश्रमीच्या भारती ठाकूर यांच्यावरील लेख विलक्षण प्रेरक आणि माहितीपूर्ण झाला आहे. जीवनाच्या संध्याकाळी सहचराच्या आजारपणात ग्रामीण भागात राहावयास आलेल्या वर्षा यांनी गावकी, ग्रामसभा, बागेतील सवंगडी, बागबगीच्या या विविध लेखांतून, तेथील विविध वेगळे अनुभव मांडले आहेत. गावकीचे काही लाभ असले तरी आता कायद्यानुसार गावकी बंद केली गेली आहे. कारण त्यामुळे अनेकांना बहिष्कृत केल्याच्या भयानक यातना, दीर्घकाळ सोसाव्या लागल्या आहेत. उत्तरायण, सफर खूबसूरत हैं .. हे लेख विलक्षण वाचनीय असून वाचकाला अंतर्मुख करतात. वर्षा कुवळेकर यांचे जीवन जगताना आलेले विविध अनुभव वाचकाला अंतर्मुख करतात. काही वाचकांना हे पुस्तक वाचून आपले विविध जीवनानुभव शब्दबद्ध करण्याची तीव्र इच्छा निर्माण होऊ शकेल, याची खात्री वाटते. **

**पुस्तकाचे नाव : सफर खूबसूरत हैं, मंजिल से भी**
**लेखिका : वर्षा कुवळेकर ८७६६५६९१३६**
**प्रकाशक : विद्यार्थी प्रकाशन, पुणे**
**प्रथमावृत्ती : ११ मे २०२५**
**पृष्ठे : १६०, मूल्य : रु. ३२०/-**

# पंप्ड स्टोरेज प्रकल्पांमध्ये महाराष्ट्राचा पुढाकार


**चंद्रकांत बामणे**


भारत स्वच्छ आणि विश्वसनीय उर्जेकडे झपाट्याने वाटचाल करत असताना, पंप्ड स्टोरेज प्रकल्प (पीएसपी) हे वीज व्यवस्था स्थिर ठेवण्यासाठी आणि नवीकरणीय उर्जेचे प्रभावीरीत्या एकत्रीकरण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपाय म्हणून उदयास आले आहेत. या बदलाच्या केंद्रस्थानी आहे महाराष्ट्र-एक असे राज्य ज्याचे भौगोलिक स्थान, पायाभूत सुविधा आणि धोरणात्मक लाभ यामुळे मोठ्या प्रमाणावर पीएसपी प्रकल्प विकसित करण्यासाठी हे सर्वात योग्य ठिकाण बनले आहे.

पंप्ड स्टोरेज प्रकल्प (पीएसपी) हा जलविद्युत उर्जा संचयनाचा एक प्रकार आहे, यामध्ये वीजेची मागणी कमी असताना, उरलेली (अधिक) वीज वापरून खालच्या जलाशयातील पाणी वरच्या जलाशयात पंप करून नेले जाते (ही वीज सहसा नवीकरणीय स्रोतांमधून येते). जेव्हा वीजेची गरज असते, तेव्हा हे साठवलेले पाणी खाली सोडले जाते आणि त्याद्वारे टर्बाइन फिरवून वीज तयार केली जाते. हा एक बंद सायकल असतो, म्हणजेच पाणी पुन्हा पुन्हा वापरले जाते. हा पर्याय कोळसा किंवा इंधनावर चालणाऱ्या वीज निर्मितीपेक्षा अधिक पर्यावरणपूरक आहे आणि खूप काळ चालते. त्यामुळे स्वच्छ ऊर्जेकडे वाटचाल करण्यासाठी पीएसपी खूप उपयुक्त ठरते.

ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, पीएसपी प्रकल्प हे बांधकामाच्या टप्प्यातही इतर ऊर्जेच्या स्रोतांपेक्षा पर्यावरणपूरक असतात, कारण बहुतांश काम (जसे की बोगदे, टर्बाइन्स, पाइपलाइन) हे जमिनीखाली केले जाते. त्यामुळे जमिनीची गरजही इतर प्रकल्पांच्या तुलनेत खूपच कमी असते. या प्रकल्पांमध्ये पाण्याचा वापर बंद साखळी पद्धतीने केला जातो, म्हणजेच पाण्याचा अपव्यय होत नाही आणि ते दूषितही होत नाही. शिवाय, जलाशय बांधल्यामुळे परिसरातील भूगर्भातील पाण्याची पातळी वाढते, ज्याचा फायदा जंगलांना आणि शेतीलाही होतो.

पंप्ड स्टोरेज प्रकल्पांच्या बाबतीत महाराष्ट्र हे एक अग्रगण्य राज्य म्हणून उदयास आले आहे. राज्याची उर्जासंबंधित पायाभूत सुविधा ही पीएसपी प्रकल्पांना वीजेच्या गरज असलेल्या ठिकाणी सहजपणे जोडण्यास मदत करते. महाराष्ट्र हे देशातील सर्वात औद्योगिक राज्य असल्यामुळे येथे विजेची मागणीही जास्त आहे आणि ही गरज पर्यावरणपूरक ऊर्जेच्या या माध्यमातून पूर्ण करता येऊ शकते. याशिवाय, राज्य सरकारने पीएसपी प्रकल्पांसाठी अनेक प्रगत व अनुकूल धोरणे स्वीकारली आहेत. मंजुरीच्या सुलभ प्रक्रियेमुळे आणि सकारात्मक धोरणांमुळे महाराष्ट्र या क्षेत्रात आघाडीवर आहे.




**मुख्य पंप्ड स्टोरेज प्रकल्प (पीएसपी)**

१.टीएचडीसी इंडिया लिमिटेड ने महाराष्ट्र सरकारसोबत एक सामंजस्य करार केला आहे, ज्याअंतर्गत राज्यात एकूण ६,७९० मेगावॅट क्षमतेचे ६ पंप्ड स्टोरेज प्रकल्प विकसित करण्यात येणार आहेत.

या प्रकल्पांमध्ये पुढील प्रकल्पांचा समावेश आहे.

माळशेज घाट पीएसपी (७०० मेगावॅट)
अरुणा पीएसपी (१,९५० मेगावॅट)
खरारी पीएसपी (१,२५० मेगावॅट)
हुमबर्ली बिरमणी पीएसपी (१,००० मेगावॅट)
अरुणा कोलंब पीएसपी (१,२०० मेगावॅट)
मोरवाडी माजरेवाडी पीएसपी (६९० मेगावॅट)

२. टाटा पॉवर राज्यात दोन पंप्ड स्टोरेज प्रकल्प विकसित करत आहे, ज्यांची एकत्रित क्षमता २,८०० मेगावॅट आहे. हे प्रकल्प शिरवटा (पुणे) आणि भिवपुरी (रायगड) येथे उभारले जात आहेत.

३.जेएसडब्ल्यू एनर्जी १,५०० मेगावॅट क्षमतेचा भिवाळी पीएसपी विकसित करत आहे.

४.अदाणी ग्रुप राज्यात पाच पीएसपी प्रकल्प विकसित करत आहे. यामध्ये साताऱ्यातील तारळी येथे १,५०० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प समाविष्ट आहे. इतर प्रकल्प नियोजनाच्या टप्प्यात आहेत.

एकूण मिळून या प्रकल्पांमधून महाराष्ट्रात अंदाजे ६०,००० ते ७०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पांच्या बांधकाम आणि संचालनाच्या टप्प्यात स्थानिक लोकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळणार आहे. स्थानिक उद्योजक आणि समुदायांनाही या प्रकल्पांमधून फायदा होणार आहे.

भौगोलिक रचना, चांगली पायाभूत सुविधा, सरकारची धोरणं आणि वीजेची वाढती मागणी या सगळ्यांचा उत्तम मेळ साधल्यामुळे महाराष्ट्र भारतातील पंप्ड स्टोरेज ऊर्जा क्रांतीचे नेतृत्व करण्यास तयार आहे. जसे की भारत नवीकरणीय ऊर्जेच्या दिशेने वाटचाल करत आहे, तसे महाराष्ट्रातील पीएसपी प्रकल्प वीज व्यवस्था पर्यावरणपूरक आणि स्थिर ठेवण्यासाठी एक महत्त्वाचा आधार बनू शकतात. गुंतवणूकदार, धोरणनिर्माते आणि नागरिकांसाठीही ही केवळ एका राज्याची संधी नाही, तर भारताच्या शाश्वत ऊर्जेच्या भविष्यासाठी एक मार्गदर्शक योजना आहे. **

# जुनं ते सोनं?

**अंकुश शिंगाडे**

जुनं ते सोनं. असं आपण नेहमी म्हणतो. परंतु जुनं ते सोनं, ही संकल्पना व्यवहारात वापरत नाही. त्यामुळं ती संकल्पना काही दिवसानं कालबाह्य होते. उदा. कंचे खेळणं. काल कंचे खेळत असतांना दिवस दिवसभर कंचे खेळणारी पिढी घराच्या बाहेर असायची. त्यांची तहानभूक हरवून जायची. तेच इतरही खेळाबाबत घडायचं. ज्यातून फायदाच व्हायचा. नुकसान व्हायचं नाही. परंतु आज तसं नाही. कारण आज मोबाइल काळ आलाय. आजही तहानभूक हरवते. परंतु ती तहानभूक मोबाइलवर खेळ खेळतांना हरवते. जे खेळ आपले सर्वतोपरी नुकसानच करीत असतात.

आधुनिक काळ आला व पुरातन काळातील सर्वच गोष्टी कालबाह्य ठरायला लागल्या. ज्यात खेळाचाही समावेश आहे. खेळात पुर्वीचा भातुकलीचा खेळ आता कालबाह्य झालाय. त्यातच चक्करबिल्ला, कंचे, विटीदांडू आता दिसत नाहीत. शिवाय पावसाळ्याच्या सुरुवातीला होणारा बाहुलाबाहूलीच्या विवाहाचा खेळ व पावसाळ्यातच सुरु होणारा सब्बल खुपसणी खेळ म्हणजे काय? हे आता कळायला मार्गच नाही. तसेच उन्हाळ्यात सुरु होणारा डाफ नावाचा खेळ हा तर समजायला जागाच नाही. असे जुने पारंपारिक खेळ आज कालबाह्य झालेले असून त्यातील काही खेळ इतिहास जमाही झालेले आहेत. त्याातच कबड्डी, लंगडी, खोखो नावाचे देशी खेळही कालबाह्य होतील की काय? अशी शंका येते. तसेच आज त्याच खेळाची जागा क्रिकेटनं जरी घेतली असली तरी क्रिकेट हा खेळही शेवटपर्यंत टिकेल की काय? ही देखील शंका आहे. कारण काल गल्लीबोळात क्रिकेट खेळणारी अगदी लहान लहान मुलं देखील आज गल्लीबोळात क्रिकेट खेळतांना दिसत नाहीत. ते घरातच मोबाईलवर ऑनलाइन खेळ खेळत असतात.

बदल...... बदल हा केवळ खेळातच झाला असे नाही. जुन्या काळात जात्यावर गाणी म्हणणारी बहिणाबाई आज दिसत नाही. कारण आज जातच नाही. तसेच काल लग्नसराईची हळद वा मिरची मसाले कांडणारे मुसळ, खलबत्ते आज दिसत नाहीत. त्यातच रोजची चटणी वाटून भाजीला खमंग चव आणणारा पाटा वरवंटा आज कालबाह्य झालाय. त्या जागेवर आज रेडीमेड मसाले आले, जे चक्की सारख्या कृत्रीम यंत्रावर दळले जातात. काल जात्यावर भरड दळणारे धान्य आज दिसत नाही. त्या जागेवर अगदी बारीक दळणारी व जीवनसत्व नष्ट करणारी यंत्र आलीत. शिवाय या यंत्रासोबतच काल जाते, पाटे व मुसळाद्वारे होणारा स्त्रीजातीचा व्यायाम आज होत नाही आणि तसा व्यायाम होत नसल्यानं आज महिलांमध्ये आजाराचे प्रमाण वाढलेले आहे. तेच घडत आहे लहान मुलांतही. कालची लहान मुलं जे खेळ खेळायची, ते खेळ आज खेळले जात नसल्यानं व केवळ मोबाईलवर एकाच जागेवर बसून व्हिडिओ खेळ खेळले जात असल्यानं कालच्यासारखा आजच्या मुलांचाही व्यायाम होत नाही. मग आजार बळावेल नाहीतर काय? आजची मुलं ही वेळोवेळी आजारी पडतात व त्यांना वेळोवेळी रुग्णालयात दाखल करावं लागतं. राहिलं पुरुषांचं. पुरुषांचाही आजच्या काळात व्यायाम बंदच झालाय. **

## निवडक





### इटलीचा पात्रता फेरीत प्रवेश

**नवी दिल्ली :** फुटबॉल वर्ल्ड कप स्पर्धेतील मोठे नाव असलेल्या इटली या देशाने आता क्रिकेट वर्ल्ड कपमध्येही पदार्पण केले आहे. इटलीच्या फुटबॉल संघाने १९३४, १९३८, १९८२ व २००६ मध्ये वर्ल्ड कप जिंकला होता. आता इटलीचा क्रिकेट संघ पुढच्या वर्षी भारत-श्रीलंका येथे होणाऱ्या ट्वेंटी-२० वर्ल्ड कप खेळणार आहे. प्रथम फलंदाजी करताना इटलीने ७ बाद १३४ धावा केल्या. नेदरलँड्सने हे लक्ष्य १४ षटकांच्या आता पार केले असते तर जर्सीला संधी मिळाली असती, परंतु त्यांनी १६.२ षटकापर्यंत मॅच नेली. इटलीकडून बेंजामिन मॅनेटी (३०), ग्रँड स्टीवर्ट (२५), हॅरी मॅनेटी (२३) व कर्णधार जो बर्न्स (२२) यांनी चांगाल खेळ केला. नेदरलँड्सच्या रोलॉफ व्हॅन डेर मेर्वेने ३ व कायले क्लेइनने दोन विकेट्स घेतल्या. नेदरलँड्सकडून फलंदाजीत मिचेल लेव्हिट (३४), मॅक्स ओ डोवड (४७) व स्कॉट एडवर्ड्स (३७) या आघाडीच्या तीन फलंदाजांनी मोहीम फत्ते केली. त्यांनी ९ विकेट्सने ही मॅच जिंकली. या निकालासह नेदरलँड्स व इटली दोन्ही संघ पुढल्या वर्षीच्या वर्ल्ड कप स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.

### नीरजला सुवर्णपदकाचा ध्यास

**गुरुग्राम :** टोकियो व पॅरिस या दोन ऑलिंपिकमध्ये पदक पटकावत भारतासाठी इतिहास रचणाऱ्या नीरज चोप्राला आता सप्टेंबर महिन्यात होत असलेल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावण्याचा ध्यास लागून राहिला आहे. याप्रसंगी भालाफेकपटू नीरज चोप्रा म्हणाला, की माझ्या खेळातील तांत्रिक बाबी शोधून काढल्या आणि त्यावर मेहनत घेत आहे. लवकरात लवकर यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहे. जेणेकरून मला जागतिक अजिंक्यपद स्पर्धेमध्ये दुसरे सुवर्णपदक पटकावता येईल. भाला फेकताना माझ्या डाव्या बाजूला जास्त प्रमाणात झुकत होतो. या तांत्रिक बाबीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहे. सातत्याने ८८ ते ८९ मीटर दूरवर भाला फेकला जात आहे. माझे प्रशिक्षक माझ्या कामगिरीवर आनंदी आहेत; पण मी समाधानी नाही. या वर्षी मी ९० मीटर दूरवर भाला फेकला; पण मला सातत्याने ९० मीटरचा टप्पा ओलांडायचा आहे. तो म्हणाला, की मला जागतिक अजिंक्यपद स्पर्धेमध्ये पदक पटकवायचे आहे; पण त्याआधी प्रशिक्षकांसोबत चर्चा करणार असल्याचे तो म्हणाला.






### भारतीय महिलांना फिफा वर्ल्ड कपमध्ये सहभागी होण्याची संधी

**नवी दिल्ली :** भारताच्या महिला फुटबॉल संघाने तब्बल २२ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर एएफसी महिला आशिया चषक स्पर्धेची पात्रता मिळवून इतिहास घडविला. भारताच्या याच महिला संघाला आता फिफा वर्ल्ड कपचे तिकीट खुणावू लागले आहे. जबरदस्त फॉर्मात असलेल्या या संघाला २०२७ मध्ये होणाऱ्या फिफा वर्ल्ड कपचे तिकीट बुक करण्याची यावेळी नामी संधी असेल.२०२६ मध्ये होणाऱ्या महिला आशियाई चषक फुटबॉल स्पर्धेत १२ देशांचा समावेश आहे. या स्पर्धेत हे १२ संघ तीन गटांत विभागले जातील. ही स्पर्धा राऊंड रॉबिन फॉरमॅटमध्ये होईल. गटातील विजेता, उपविजेता व तिसऱ्या स्थानावरील दोन सर्वोत्तम संघ स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत दाखल होतील. उपांत्यपूर्व फेरीतील विजेते संघ २०२७ च्या महिला फुटबॉल वर्ल्ड कपसाठी पात्र ठरणार आहेत. या फेरीतील पराभूत संघ एकमेकांविरुद्ध भिडतील. यातील विजेता संघ आधीच पात्र ठरलेल्या चार संघांत सहभागी होईल. यातील पराभूत संघांनाही पात्रता मिळविण्याची आणखी एक संधी असेल. या फॉरमॅटमुळे भारताच्या महिला संघाला फिफा वर्ल्डसाठी पात्र ठरण्याची यंदा संधी असेल.

### जोफ्रा आर्चरचा चैनीचा गैरवापर

**लॉर्ड्स :** इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर चार वर्षांहून अधिक काळानंतर कसोटी क्रिकेटमध्ये परतला आहे. चार वर्षानंतरही आर्चरचे पुनरागमन हे दमदार होते. आर्चरचे लॉर्ड्स कसोटीत भारताविरुद्धचे पुनरागमन खूपच शानदार होते. आर्चरने भारताचा स्टार फलंदाज यशस्वी जयस्वालला त्याच्या पहिल्याच षटकात बाद करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पण या शानदार कामगिरीदरम्यान, त्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामुळे तो वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.आर्चर नेहमी त्याच्या हेअरस्टाईल आणि गळ्यातील चैनसाठी चर्चेचा विषय बनतो. ज्यामुळे आर्चर वादाच्या भोवऱ्यात अडकलेला दिसत आहे. या व्हिडिओमध्ये आर्चर त्याच्या सोन्याच्या चैनवर चेंडू घासताना दिसत आहे. हे आयसीसीच्या नियमांचे उल्लंघन आहे, कारण चेंडूच्या पृष्ठभागावर बाहेरील वस्तूने घासणे हे बॉल टॅम्परिंगच्या श्रेणीत येते. अशा कृतीमुळे चेंडू रिव्हर्स स्विंग होण्यास मदत होऊ शकते.



# साहेबांना बुमराचा दणका

## ३८७ वर इंग्लडचे सर्व बाद, भारताची सावध सुरुवात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**जसप्रीत बुमराने बेन स्टोक्स, ज्यो रुट आणि ख्रिस व्होक्स या तिघांच्या दांड्या उडवत इंग्लंडच्या पहिल्या डावाची बत्ती गुल केली. पण इंग्लंडचा सुपर फॉर्मात असलेल्या जॅमी स्मिथने ब्रायडन कार्सच्या साथीने ८४ धावांची भागी रचल्यामुळे इंग्लंडचा पहिला डाव ३८७ धावांपर्यंत मजल मारू शकला. त्यानंतर खेळण्यासाठी आलेल्या भारतनेही सावध पवित्रा घेत फलंदाजी केली. तरीही भारत आपल्या ३ विकेट गमवाव्या लागल्या. त्यामुळे दुसऱ्या दिवसअखेर भारत ३ बाद १४५ अशा स्थितीत पोहोचला. खेळ थांबला तेव्हा केएल राहुल ५३ तर ऋषभपंत १९ धावांवर खेळत होता.**




बेंझबॉलला गुंडाळून पारंपरिक कसोटी क्रिकेटच्या ट्रकवर परतलेल्या इंग्लंडची गुरुवारी ४ बाद २५१ अशी दमदार स्थिती होती. गुरुवारी नाबाद ९९ धावांवर असलेल्या ज्यो रुटने दिवसाच्या पहिल्याच चेंडूवर बुमराला चौकार खोकत आपले ३७ वे कसोटी शतक झळकवले. पण बुमराने दुसरया षटकात इंग्लंडची दांडी गुल करत ही जोडीही पडली आणि इंग्लंडला सकाळी सकाळीच हादरवले. त्यानंतर तिसरया षटकाच्या पहिल्याच चेंडूवर रुटची अलगद यष्टी वाकवत सनसनाटी निर्माण केली. बुमराचा चेंडू इतका भन्नाट होता की, रुटला कळण्याच्या आधीच तो त्रिफळाचीत झाला. मग पुढच्याच चेंडूवर ख्रिस व्होक्सचाही त्रिफळा उडवून खळबळ माजवली. बुमराला हॅटट्रिकची संधी होती, पण ब्रायडन कार्सने ती होऊ दिली नाही. अवघ्या २० धावांत ३ फलंदाज बाद झाल्याने इंग्लंडचे पंबरडेच मोडले होते. पण बुमराच्या मेहनतीवर जॅमी स्मिथ आणि ब्रायडन कार्सने पाणी फेरले. स्मिथने सलग तिसरी अर्धशतकी खेळी करताना ५६ चेंडूंत ५१ धावा केल्या. इंग्लंडने आक्रमक फलंदाजी बाजूला खेवली असली तरी स्मिथ आणि कार्सन ३५० धावांचा टप्पा गाडून दिला.

### भारत ३ बाद १०७ धावा

**इंग्लंडने आपली बॅझबॉल शैली म्यान केल्यानंतर भारतानेही आपल्या फलंदाजीत सावध पवित्रा पत्करला. यशस्वी जैसवालने ३ चौकारांसह खणखणीत सुरुवात केली, पण जोफ्रा आर्चरने आपल्या तिसऱ्याच चेंडूवर जैसवालला बाद करत आपले पुनरागमन साजरे केले. ३ बाद १०७ अशा धावसंख्येनंतर राहुल आणि पंतने इंग्लंडला चौथे यश मिळू दिले नाही.**

### कपिलला टाकले मागे

**बुमराने दिवसाच्या प्रारंभीच तीन त्रिफळे उडवत त्याने १३ व्यांदा परदेशात डावात ५ विकेट टिपण्याचा पराक्रम केला. तसेच कपिल देवचा १२ वेळा परदेशात ५ विकेट घेण्याच्या विक्रमालाही मागे टाकले. आता आशिया खंडाबाहेर ही कामगिरी करणारा तोच सर्वोत्तम गोलंदाज आहे. त्याने ७४ धावांत ५ विकेट टिपले.**

## पावसाळी क्रीडा स्पर्धेसाठी सहविचार सभेचे आयोजन



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका शिक्षण विभागाच्यावतीने पावसाळी क्रीडा स्पर्धांच्या सहविचार सभेचे आयोजन शिक्षण विभागाचे वतीने नेरळ विद्या मंदिर शाळेत घेण्यात आली होती.


तालुकास्तर शालेय क्रीडा स्पर्धा सभेचे आयोजन तालुका गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. तालुक्यातील बहुतांश शाळांचे मुख्याध्यापक आणि क्रीडा शिक्षक यांच्या उपस्थितीत सहविचार सभा घेण्यात आली होती. तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील आणि समीर येरूणकर यांनी स्पर्धांचे संपूर्ण नियोजन केले होते. यावर्षी पावसाळी क्रीडा स्पर्धेत कबड्डी, खो-खो, मैदानी स्पर्धा, हॉलीबॉल, कुस्ती, बुद्धिबळ या सहा खेळांसोबत कॅरम, कराटे, योगा आणि बॅडमिंटन या चार नवीन खेळांसह एकूण दहा खेळांचे आयोजन करणार आहेत. मागील अनेक वर्षे तालुक्यामध्ये अत्यंत पारदर्शकपणे आणि प्रभावीपणे क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याचे उद्दिष्ट ठेवोण्यात आले.

पावसाळी क्रीडा स्पर्धेसाठी सहभागासाठी ऑनलाईन नोंदणी कशी करावी. तसेच वयोगटाचा तपशील, वजन गटाचा तपशील आदी बाबतीत चर्चा करण्यात आली. सभेसाठी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अनंत रामजी खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीसह विस्ताराधिकारी अरुण पारधी, पी. एस. म्हात्रे, सोनावळे, देविदास जाधव तसेच सर्व केंद्रप्रमुख उपस्थित होते.

## जोकोविचचे ग्रॅण्डस्लॅमचे अधुरे

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

सलग सातव्या ग्रॅण्डस्लॅम स्पर्धेत नोव्हाक जोकोविचचे ग्रॅण्डस्लॅमच्या सिल्व्हर ज्युबिलीचे स्वप्न अधुरेच राहिले. जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या यानिक सिनरने अवघ्या एक तास ५५ मिनिटांत सातवेळा विम्बल्डन जिंकणाऱ्या नोव्हाक जोकोविचचे ६-३, ६-३, ६-४ अशा सरळ सेट्समध्ये स्वप्न भंग करत प्रथमच विम्बल्डनच्या पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली. दुसरीकडे कार्लोस अल्काराझने विम्बल्डनच्या हिरवळीवर आपला भन्नाट खेळ कायम राखत अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झचे आव्हान ६-४, ५-७, ६-३, ७-६ (८-६) असे मोडीत काढत सलग तिसरयांदा विम्बल्डनच्या पुरुष एकेरीची अंतिम फेरी गाठण्याचा पराक्रम केला.



आजचा दिवस नोव्हाक जोकोविचसाठी निराशेचा ठरला. आपल्या २५ व्या ग्रॅण्डस्लॅमचे स्वप्न विम्बल्डनच्या हिरवळीवर साकार करण्याचे ध्येय जोकोविचने समोर ठेवले होते, मात्र आज सिनरपुढे तो पूर्णपणे निष्प्रभ ठरला. त्याने पहिले दोन्ही सेट सहज गमावल्यानंतर तिसऱ्या सेटमध्ये तीन मॅचपॉइंट वाचवत सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, पण तो अपयशी ठरला. गेल्या सहाही विम्बल्डन स्पर्धेत तो अंतिम फेरीत पोहोचला होता. मात्र यंदा त्याचे आव्हान उपांत्य फेरीतच संपुष्टात आले. त्यामुळे फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत विक्रमी लढलेले अल्कराझ आणि सिनर हे दोन युवा दिग्गज पुन्हा एकदा जेतेपदासाठी झुंजतील.

## भुवनेश्वरची कारकीर्द संपुष्टात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघातील भुवनेश्वर कुमारकडे केवळ निवृत्तीचा पर्याय उरला आहे. भुवनेश्वरने २१ जानेवारी २०२२ रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारतीय संघासाठी शेवटचा एकदिवसीय सामना खेळला आहे.

टी-२० बद्दल बोलायचे झाले तर भुवनेश्वरने २२ नोव्हेंबर २०२२ रोजी न्यूझीलंडविरुद्ध भारतीय संघासाठी शेवटचा सामना खेळला आहे. २०१८ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध जोहान्सबर्ग कसोटी सामन्यात भुवनेश्वर त्याच्या कारकिर्दीमधील सर्वोत्तम कामगिरी केलेली. या कामगिरीच्या जोरावर तो सामन्यात 'मॅन ऑफ द मॅच' ठरला होता. मात्र त्यानंतर त्याची कसोटी कारकीर्द जवळजवळ संपुष्टात आली.

## टी-२० क्रिकेटमध्ये ४८७ धावा

**। बुल्गेरिया । वृत्तसंस्था ।**

क्रिकेटमध्ये रोज नवे विक्रम रचले आणि मोडले जातात. असाच एक विक्रम टी२० क्रिकेटमध्ये रचला गेला आहे. या सामन्यात १४ पेक्षा अधिकच्या धावगतीने धावांचा पाऊस पाडला गेला आहे. टी २० क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच एकूण ४१ षटकार मारण्यात आले. तर दोन्ही डावांमध्ये मिळून ३५ पेक्षा कमी षटकात ४५० हून अधिक धावा केल्या आणि जुना विक्रम मोडला गेला आहे. या विजयासह बुल्गेरियाचा संघ गुणतालिकेत चार गुणांसह अव्वल स्थानी आहे. जिब्राल्टर पराभूत झाला असला तरी त्यांच्याकडेही चार गुण आहेत. पण नेट रनरेटच्या गणितात बुल्गेरिया पुढे आहे. तुर्की या मालिकेत सहभागी असून दोन्ही सामन्यात पराभूत झाली आहे. त्यामुळे अंतिम फेरीत बुल्गेरिया आणि जिब्राल्टर हा सामना होईल.




जिब्राल्टरने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ७ गडी गमवून २४३ धावा केल्या. यात सलामीला आलेल्या फिल रॅक्सने ३३ चेंडूत ७३ धावांची खेळी केली. यात चार चौकार आणि ८ षटकार मारले. तर कर्णधार इयान लॅटिनने ५१ धावांची खेळी केली. लुईस ब्रूसने २४ धावा, तर ख्रिस पाईलने २२ धावांची खेळी केली. बुल्गेरियाकडून जॅकब गुलने चार षटकात ३७ धावा देत ४ गडी बाद केले.

या धावांचा पाठलाग करताना बुल्गेरियाने १५ षटकातच सामना संपवला. बुल्गेरियाकडून मनन बशीरने आक्रमक फलंदाजीचं दर्शन घडवलं. त्याने २१ चेंडूत ३ चौकार आणि ९ षटकार मारत ७० धावांची खेळी केली. तर इसा जरूने २४ चेंडूत ९ चौकार आणि ५ षटकार मारत ६९ धावा केल्या. मिलनग गोगेवने ६९ धावांचं योगदान दिलं. तर कर्णधार ख्रिस लाकोवने १९ धावा केल्या. जिब्राल्टरकडून लुईस ब्रूसने चार षटकात ४८ धावा देत दोन गडी बाद केले.

## जिल्हा गोविंदा पथक असोशिएन अध्यक्षपदी कृणाल मोर्ले

**। कोलाड । वार्ताहर ।**

रायगड जिल्ह्यसह सबंध देशभरात गोविंदा उत्सव अथवा दहीहंडी उत्सव हा मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. महाराष्ट्रातसह मुंबई येथील दहिहंडी उत्सवात एकावर एक थर लावण्यासाठी असंख्ये गोविंदा पथक सहभाग घेतात. जिल्ह्यात विविध ठिकाणी मानाच्या दहीहंडी उत्सव साजरा करण्यासाठी येथील गोविंदा पथक भाग घेतात. या अनुषंगाने जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचे पालन करून साजरा करण्यात यावा त्याच बरोबर गोविंदा पथकातील गोविंदा तथा बाल गोपाल यांच्या रक्षणार्थ या असोसिएशनची स्थापना करण्यात आली असून जिल्हा असोसिएशन अध्यक्षपदी कुणाल मोर्ले यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे.




गोविंदा उत्सवासाठी गोविंदा पथकांची लगबग सुरु झाल्याचे पहावयास मिळत आहे तर सर्वत्र सराव प्रशिक्षण गोविंदाला देण्याचे काम स्थानिक पातळीवर गाव मंडळी युवामंडळ यांच्याकडून केला जात आहे यासाठी जिल्हा गोविंदा असोसिएशन शासन नोंदणी क्र. रायगड / ०००१२०/२०२५ करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा गोविंदा असोसिएशन अध्यक्ष कृणाल मोर्ले, उपाध्यक्ष जितेश कृष्णा भोईर, कार्याध्यक्षप्रमोद जांबेकर, सचिवसंतोषभोईरसहसचिव शुभम पाटील, खजिनदार प्रसाद गोतावडे, सहखजिनदाररोहन तांबे, सदस्य योगेश मोरे, संजय पोईलकर, कौस्तुभ देवळेकर, अनघा खोत, सह जिल्ह्यातील हौशी आणि कर्तबगार सामाजिक कार्यकर्ते यांची या असोसिएशनच्या संचालक मंडळावर निवड करण्यात आली आहे.

## ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी नवीन कर्णधार

**। नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

भारतीय महिलांचा 'अ' संघ पुढील महिन्यात ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यासाठी संघाची कर्णधार म्हणून राधा यादवची निवड करण्यात आली आहे.

यादवने नुकतीच भारतीय संघाकडून १०० वी ट्वेंटी-२० मॅच खेळली आणि तीची आगामी दौऱ्यासाठी भारत अ महिला संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. केरळची मिन्नू मणी आता उपकर्णधार असेल, इंग्लंडविरुद्धच्यामालिकेत पुनरागमन केल्यानंतर शफाली वर्मालाही वन डे व ट्वेंटी-२० अशा दोन्ही संघात स्थान देण्यात आले आहे. वृंदा दिनेशला संधी मिळाली आहे, परंतु किरण नवगिरेची निवड झालेली नाही.

**भारत 'अ' महिला ट्वेंटी-२० संघ** राधा यादव (कर्णधार), मिन्नू मणी, शफाली वर्मा, डी. वृंदा, सजना सजीवन, उमा चेत्री, रघवी बिस्त, श्रेयंका पाटील, प्रेमा रावत, नंदिनी कश्यप, तनुजा कंवर, जोशिता व्हीजे, शबनम शकील, साईमा ठाकरे, तितास साधूवन डे आणि

**बहुदिवसीय संघ :** राधा यादव, मिन्नू मणी , शफाली वर्मा, तेजल हसबनीस, राघवी बिस्त, तनुश्री सरकार, उमा चेत्री, प्रिया मिश्रा, तनुजा कंवर, नंदिनी कश्यप , धारा गुजर, जोशिता व्हीजे, शबनम शकील, साईमा ठाकोर, तितास साधू संघात असणार आहे.

## सेंट-जर्मेनने उडवला रियल माद्रिदचा धुव्वा



**। रुदरफोर्ड । वृत्तसंस्था ।**

फॅबियन रुईझच्या दुहेरी गोलच्या जोरावर पॅरिस सेंट-जर्मेनने रियल माद्रिदचा धुव्वा उडवत फिफा क्लब विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत चेल्सीविरुद्ध आपले स्थान निश्चित केले. फॅबियन रुईझने दोन गोल केले, तर औसमाने डेम्बेलेने एक गोल आणि एका गोलसाठी सहाय्य केले. या कामगिरीच्या बळावर पॅरिस सेंट-जर्मेनने उपांत्य सामन्यात रियल माद्रिद आणि किलियन एम्बाप्पे यांना स्पर्धेतून बाहेरचा रस्ता दाखवत ४-० असा सहज विजय मिळवला. जियानलुईगी डोनारुम्माने सामन्याच्या सुरुवातीला एम्बाप्पेचा एक फटका अडवला आणि एकूण दोन बचाव केले. चॅम्पियन्स लीगच्या अंतिम सामन्यात पीएसजीकडून ५-० ने पराभूत झालेल्या इंटर मिलानपेक्षा रियल माद्रिदची कामगिरी चांगली नव्हती. मेटलाईफ स्टेडियममध्ये रणरणत्या उन्हात ७७,५४२ प्रेक्षक उपस्थित होते. सामन्याच्या सुरुवातीला तापमान ३३ अंश सेल्सिअस (९१ अंश फॅरेनहाईट) होते आणि आर्द्रतेमुळे ते ३८ अंश सेल्सिअस (१०१ अंश फॅरेनहाईट) जाणवत होते.

### एक-एक गुणासाठी संघर्ष | फ्रेंच ओपन अंतिम फेरीची पुनरावृत्ती

# अल्काराझ-सिनरमध्ये जेतेपदाची झुंज

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

विम्बल्डन ग्रँडस्लॅम प्रतिष्ठेच्या टेनिस स्पर्धेतील पुरुषांच्या अंतिम फेरीत फ्रेंच ओपन स्पर्धेच्या अंतिम फेरीची पुनरावृत्ती पाहायला मिळणार आहे. फ्रेंच ओपनप्रमाणे कार्लोस अल्काराझ व यानिक सिनर या दोन टेनिसपटूंमध्ये जेतेपदाची झुंज रंगणार आहे. अल्काराझ याने अमेरिकेच्या टेलर फ्रिट्झ याला चार सेटमध्ये पराभूत केले, तर सिनर याने दिग्गज खेळाडू नोवाक जोकोविचला सरळ तीन सेटमध्ये नमवले. कार्लोस अल्काराझ-टेलर फ्रिट्झ यांच्यामधील पहिल्या सेटमध्ये कडवा संघर्ष पाहायला मिळाला, पण दबावाखाली अल्काराझने आपला खेळ उंचावला आणि फ्रिट्झ याची सर्व्हिस मोडून काढली. अल्काराझ याने पहिला सेट ६-४ असा आपल्या नावावर केला. त्यानंतर पुढील सेटमध्ये फ्रिट्झ याने पुनरागमन केले. त्याने हा सेट ७-५ असा जिंकून १-१ अशी बरोबरी साधली.



कार्लोस अल्काराझ याने यंदाच्या मोसमात फ्रेंच ओपन ग्रँडस्लॅम जेतेपद पटकावले आहे. त्याने आपला तोच फॉर्म याही ग्रँडस्लॅममध्ये कायम ठेवला. त्याने तिसरा सेट ६-३ असा जिंकला. चौथ्या सेटमध्ये पुन्हा कडवी झुंज पाहायला मिळाली. एक-एक गुणासाठी संघर्ष पाहायला मिळाला. दोन्ही खेळाडूंमध्ये ६-६ अशी बरोबरी झाल्यानंतर टायब्रेकमध्ये अगदी तशीच रोमहर्षकता दिसून आली. अल्काराझ याने ७-६ असे यश मिळवत फायनलमध्ये प्रवेश केला.

महिला एकेरीच्या जेतेपदासाठी पोलंडची २४ वर्षीय खेळाडू इगा स्विअतेक व अमेरिकेची २३ वर्षीय खेळाडू अमांडा निसिमोवा यांच्यामध्ये अजिंक्यपदाची लढत रंगणार आहे. स्विअतेक हिने अद्याप विम्बल्डन ग्रँडस्लॅमचे जेतेपद पटकावलेले नाही. अमांडा हिला तर एकाही ग्रँडस्लॅम जेतेपदाला गवसणी घालता आलेली नाही. यंदा विम्बल्डन ग्रँडस्लॅमला नवी विजेती मिळेल, ही काळ्या दगडावरील रेघ आहे.

इगा स्विअतेक हिने २०२०, २०२२, २०२३ व २०२४ या वर्षांमध्ये फ्रेंच ओपन ग्रँडस्लॅमवर मोहर उमटवली. तिने २०२२मध्ये अमेरिकन ओपन ग्रँडस्लॅमही आपल्या नावावर केले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)